खे. ता. शि. प्र. मंडळाचे

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

ता. खेड, जि. पुणे. 410505

# भूगोल विभाग

# गाव सर्वेक्षण अहवाल

## मौजे दोंदे
## ता. खेड, जि. पुणे

सर्वेक्षक
टी. वाय. बी. ए. विद्यार्थी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दिलीप मुळूक

प्रा. डॉ. डी.एम.मारकड

प्रा. एम.एल. मुळूक

**2022 – 2023**

**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

**ता. खेड, जि. पुणे. 410505**

# भूगोल विभाग

# सन २०२२ – २०२३

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु./कुमारी

---------------------------------------------------------------------------------

रोल नंबर ---- परिक्षा क्रमांक ------हयाने /हिने .................. मध्ये सन 2022- 2023 या शैक्षणिक वर्षात भूगोल या विषया अंतर्गत ग्रामसर्वेक्षण अहवाल ( मौजे दोंदे ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे ) मध्ये सहभागी होऊन ग्रामसर्वेक्षणाचे प्रात्यक्षिक काम समाधानपुर्वक पुर्ण केले आहे.

प्रा. एम. एल. मुळूक
(समन्वयक)

प्रा. दिलीप मुळूक
(भूगोल विभाग प्रमुख)

# ऋणनिर्देश

पुणे विद्यापीठाच्या कलाशाखे अंतर्गत विशेष स्तरवर भूगोल या विषया अंतर्गत प्रात्यक्षिक कामकाज तयार करणे अनिवार्य आहे.

शैक्षणिक वर्ष भूगोल या विभागातील सन 2022 - 2023 या कालावधीत भूगोल विषयावर प्रात्यक्षिक कार्यावर वृत्तांत तयार करणे यामध्ये ग्रामसर्वेक्षण हा विषय निवडला असून मौजे दोंदे , ता. खेड (राजगुरुनगर), जि. पुणे या ठिकाणी जावून भेट दिली. यावरून निरिक्षण करून हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार केला आहे.

प्राचार्य. डॉ. शिरीष पिंगळे आणि उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी आम्हाला ग्रामसर्वेक्षणास जाण्यास परवानगी दिली. तसेच आम्हाला ग्रामसर्वेक्षणास जाण्यास प्रोत्साहित केले त्याबद्दल आम्ही सर्व त्यांचे आभारी आहोत.

हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार करण्यासाठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप मुळूक, तसेच प्रा. डी. एम. मारकड, आणि प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचे आभारी आहे. तसेच हा ग्रामसर्वेक्षण वृत्तांत तयार करण्यासाठी ग्रंथालय प्रमुख प्रा. तापकिर मॅडम व त्यांचे सहकारी यांनी वृत्तांता संदर्भातील पुस्तके उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी त्यांचे आभारी आहे . तसेच त्या गावचे सरपंच उपसरपंच व गावातील नागरीक यांनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे.

त्याचप्रमाणे माझया सर्व मित्रमैत्रिणींनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

भूगोल विभागाचे शतषः आम्ही सर्वजण आभारी आहोत.

-----------------------------------------------------

**विद्यार्थ्याचे नाव व सही**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नाव आणि तपशिल | पान नं |
|---|---|---|
| **प्रकरण पहिले - ग्राम सर्वेक्षण स्वरूप, व्याप्ती व महत्त्व** | | |
| 1.1 | प्रस्तावना | 1 |
| 1.2 | सर्वेक्षणाचे स्वरूप | 1 |
| 1.3 | सर्वेक्षणाचे महत्त्व | 2 |
| 1.4 | सर्वेक्षणाच्या अभ्यासपध्दती | 2 |
| 1.5 | **सर्वेक्षणाची व्याप्ती** | 4 |
| **प्रकरण दुसरे – दोंदे ग्राम- क्षेत्र अभ्यास** | | |
| 2.1 | दोंदे गावचा इतिहास | 5 |
| 2.2 | दोंदे गाव गावाची सर्वसाधारण माहिती | 5 |
| 2.3 | भौगोलिक स्थान | 6 |
| 2.4 | स्थान- सापेक्ष निरपेक्ष | 6 |
| **प्रकरण तिसरे - प्राकृतिक रचना** | | |
| 3.1 | भूपृष्ठरचना | 8 |
| 3.2 | जलप्रणाली | 9 |
| 3.3 | मृदा | 10 |
| 3.4 | हवामान | 11 |
| 3.5 | वनस्पती | 11 |
| 3.6 | प्राणी आणि पक्षी | 12 |
| 3.7 | वहतूक आणि दळणवळण | 12 |
| **प्रकरण चौथे - सामाजिक घटक** | | |
| 4.1 | लोकसंख्या | 13 |
| 4.2 | धर्मनिहाय वितरण | 13 |
| 4.3 | जातीनिहाय लोकसंख्या | 15 |
| 4.4 | कुटुंब पद्धती | 16 |
| 4.5 | दोंदे गावातील कुटुंबाचा आकार | 16 |

| | | |
|---|---|---|
| 4.6 | दोंदे गावातील स्त्री पुरुष प्रमाण | 17 |
| 4.7 | वयोगट रचना (कुटुंबातील सदस्य संख्येनुसार) | 18 |
| 4.8 | वयोगट रचना ( एकूण लोकसंख्येनुसार) | 19 |
| 4.9 | साक्षरता प्रमाण | 19 |
| 4.10 | वैवाहिक स्थिती | 20 |
| 4.11 | निवासाचे स्थान | 21 |
| 4.12 | स्थलांतर | 22 |

**प्रकरण पाचवे - आर्थिक घटक**

| | | |
|---|---|---|
| 5.1 | व्यावसायीक रचना | 23 |
| 5.2 | नोकरी | 25 |
| 5.3 | जमिन मालकी हक्क | 26 |
| 5.4 | जमिनीचे प्रमाण | 26 |
| 5.5 | जलसिंचन | 27 |
| 5.6 | जलसिंचनाच्या सोयी | 28 |
| 5.7 | प्रमुख धान्य पिके | 29 |
| 5.8 | प्रमुख बागायती पिके | 30 |
| 5.9 | वार्षिक उत्पन्न | 31 |
| 5.10 | आहार विहार | 32 |
| 5.11 | आहार विहार (अन्नपदार्थ) | 33 |
| 5.12 | निवारा | 34 |
| 5.13 | भिंतींचे प्रकार | 35 |
| 5.14 | घरांच्या छप्पराचा प्रकार | 36 |
| 5.15 | घरांचा आकार | 37 |
| 5.16 | इंधनाचा प्रकार | 38 |
| 5.17 | गोठ्याबाबतची स्थिती | 39 |
| 5.18 | उपलब्ध पशुधन | 40 |

**प्रकरण सहावे - सांस्कृतिक घटक**

| | | |
|---|---|---|
| 6.1 | सण समारंभ | 42 |
| 6.2 | चालीरीती | 43 |

6.3 गावची यात्रा 43
6.4 विवाह पद्धती 43
6.5 वेशभूषा 44

**प्रकरण सातवे - विविध सुविधा, समस्या व उपाययोजना**

7.1 स्नानगृहे 46
7.2 स्वच्छतागृह 47
7.3 पिण्यासाठी पाणीपुरवठा 47
7.4 इंधन 48
7.5 वाहतुकीची साधने 50
7.6 मनोरंजनाची साधने 51
7.7 घरगुती उपकरणे 51
7.8 इतर उपकरणे 52

निष्कर्ष 53
अभाव/समस्या 54
उपाययोजनना 55
छायाचित्रे 56

# प्रकरण पहिले

# ग्राम सर्वेक्षण स्वरूप,

**1.1 प्रस्तावना -**

भूगोल विषयाद्वारे आपण अनेकविध घटकांचा अभ्यास करतो. त्यामध्ये प्राकृतिक घटकांचा अभ्यास प्रामुख्याने केला जातो. परंतु बदलत्या काळानुसार भूगोलाच्या शाखांचा विस्तार झाला. त्यामुळे मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक घटकांचा अभ्यास करणे हे त्यामध्ये साहजिकच अंतर्भूत झाले. आज इंटरनेटच्या शोधामुळे माहितीचा विस्फोट झाला आहे. एखादी माहिती आपल्याला हवी असेल तर एका क्षणात एका बटणावर सहज उपलब्ध होत आहे. इंटरनेटबरोबरच माहिती मिळविण्याचे आणखी काही स्त्रोत उपलब्ध आहेत. त्यामध्ये पुस्तके, नकाशे, विविध टी.व्ही. चॅनेल इ. परंतु या सर्वांद्वारे मिळालेली माहिती ही अप्रत्यक्षपणे आपल्याला मिळते. आपण स्वतः त्यासाठी काहीही केलेले नसते. जेव्हा आपण एखाद्या ठिकाणी जावून प्रत्यक्ष माहिती मिळवतो, निरिक्षणे करतो, व मिळालेल्या माहितीवरून निष्कर्ष काढतो तेव्हा त्यास क्षेत्रअभ्यास असे म्हणतात.

कोणत्याही घटकाच्या स्थानीय वितरणाच्या अभ्यासाला महत्व असते. भारतात सुमारे सहा लाख खेडी आहेत. या खेड्यांमध्ये अनेक घटकांच्या बाबतीत अनेक प्रकारच्या खेडी स्वयंपूर्ण होती. खेडे हे देशाचेच एक छोटे एकक असल्याने खेड्याचा अभ्यास म्हणजेच पर्यायाने देशाचा अभ्यास ठरतो. त्यामुळे खेडयाचा अभ्यास करणे भूगोल अभ्यासकाला महत्वाचे आहे. आपल्या राहत्या ठिकाणापासून जवळच्याच परिसरातील एखाद्या गावास भेट देवून तेथील प्राकृतिक, सांस्कृतिक घटकांचे निरीक्षण करून सर्वेक्षणाद्वारे माहिती संकलित करणे व संकलित केलेल्या माहितीच्या आधारे त्या गावाचा अहवाल तयार करणे हे ग्राम सर्वेक्षणामध्ये अपेक्षित आहे.

भूगोल विषयाचे अध्ययन करणा-या विद्यार्थ्यांना ग्रामसर्वेक्षणाचा अनुभव प्रात्यक्षिकाच्या निमित्ताने येत असतो व या प्रकारचा अनुभव येणे हे अतिशय महत्वाचे असते.

**1.2 सर्वेक्षणाचे स्वरूप-**

2022 - 2023 च्या भूगोल विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमात असलेल्या ग्रामसर्वेक्षणासाठी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील दोंदे हे गाव निवडलेले आहे. या गावाचे स्थान, प्राकृतिक रचना, पर्वत, पठारे, जलप्रणाली, वनस्पती, प्राणी, खडक, खनिजे, लोकसंख्या, वसाहती, व्यवसाय, राहणीमान, या घटकांचा येथे अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे

सर्वेक्षणाच्या अभ्यासपद्धती - या गावसर्वेक्षणा मध्ये सुमारे 105 प्रश्नावली गावातील कुटुंबांकडून भरूण घेण्यात आल्या. या प्रश्नावलींच्या आधारे तसेच पुस्तके आणि इतर संदर्भ साहित्याच्या आधारे प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला.

**1.3 सर्वेक्षणाचे महत्त्व**

ग्राम सर्वेक्षणामुळे त्या क्षेत्रातील प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांशी असलेला संबंध लक्षात येतो. त्यांचे स्पष्टीकरण करणे सुलभ जाते. सर्वेक्षण ही भौगोलिक अभ्यासाची महत्त्वाची पध्दती आहे. क्षेत्राचे अर्थपूर्ण आकलन होण्यासाठी सर्वेक्षण करून क्षेत्र अभ्यास उपयुक्त ठरतो. आपण भौगोलिक घटकांचे निरीक्षण करतो तेथील वस्तुस्थिती जाणून घेतो. तेथील माहिती संकलित करतो, अशा संकलित केलेल्या माहितीचे पृथक्करण कसे करावे याचे कौशल्य आपणास सर्वेक्षणामुळे प्राप्त होते. तो प्रदेश किंवा ते गाव भोवतालच्या प्रदेशापेक्षा कसा भिन्न आहे हे ओळखता येते. सर्वेक्षणामुळे वेगवेगळया प्रदेशातील पर्यावरणाची तुलना करण्याचे कौशल्य मिळते. त्याचप्रमाणे आम्ही केलेल्या दोंदे गावाच्या सर्वेक्षणामुळे आम्हाला तेथील विविध भौगोलिक घटकांची माहिती मिळाली व त्याचे महत्त्व आम्हाला समजले.

भूगोल विषयामध्ये गाव सर्वेक्षणाचे महत्व अनन्य साधारण आहे. गाव हा स्वतंत्र स्वयंभू प्रदेश असतो. गाव स्वयंपूर्ण घटक असतो. गाव हा छोट्या स्वरूपाचा देशच असतो. तो देशाचे प्रतिबिंब दाखविणारा अंश असतो. गावाच्या अभ्यासाने देशाविषयी काही अनुमान करता येते. गाव सर्वेक्षणाने गावाविषयी शास्त्रशुद्ध माहिती मिळते. गावाची प्राकृतिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्थिती, विकास यांचा आलेख समजतो. तसेच गावातील समस्या लक्षात येवून त्या समस्या सोडविण्याचा मार्ग सापडतो. गावाच्या विकासावरच देशाचा विकास अवलंबून आहे. यामुळे भूगोलाच्या अभ्यासात गाव सर्वेक्षणाला महत्व आहे.

**1.4 सर्वेक्षणाच्या अभ्यासपध्दती**

भूगोल विषयामध्ये विविध प्रकारची भौगोलिक माहिती मिळविण्यासाठी अनुरूप अशा साधनसामग्रीची आवश्यकता असते. भूगोलातील सामग्री ही वैशिष्टपूर्ण असून ती मुख्यत्वे दोन प्रकारात विभागली जाते.

1. प्राथमिक स्वरूपाची सामग्री

2. द्वितीय स्वरूपाची सामग्री

**1. प्राथमिक स्वरूपाची सामग्री**

प्राथमिक स्वरूपाची सामग्री मिळविण्यामध्ये अभ्यासकर्त्याची भूमिका महत्वाची असते. ही सामग्री प्राप्त करण्यासाठी काही पध्दती आहेत

1. **निरीक्षण पध्दती, क्षेत्र अभ्यास पध्दती, मुलाखत पध्दती**

यांतील क्षेत्र अभ्यास पध्दतीमध्ये कोणत्या प्रकारची सामग्री मिळवावयाची आहे त्यानुसार साधनांचा वापर केला जातो. यात प्रामुख्याने सर्वेक्षण प्रश्नावलीचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो. उदा. ग्रामीण व शहरी भागाविषयी भौगोलिक दृष्टया सर्वेक्षण करावयाचे असल्यास शहरी व ग्रामीण भागासाठी वेगवेगळया प्रकारची सर्वेक्षण प्रश्नावली तयार करावी लागते. याशिवाय कोणत्या प्रकारची माहिती मिळवावयाची आहे, त्यानुसार प्रश्नाची रचना किंवा आखणी करावी लागते. या व्यतिरीक्त निरीक्षण आणि मुलाखत तंत्राचाही उपयोग करावा लागतो. यानंतर अभिप्रेत असलेल्या निकषांनुसार सामग्रीचे वर्गीकरण व विश्लेषण करणे आवश्यक असते. तसेच प्रदेशाचा नकाशा तयार करणे गरजेचे असते. याचाच अर्थ भूगोलामध्ये एखादया प्रदेशाची भौगोलिकदृष्टया माहिती मिळवावयाची असल्यास सर्वेक्षण ही पध्दती महत्त्वपूर्ण असून यामध्ये निरीक्षण, लेखन, चित्रीकरण, वर्गीकरण, आलेखन या बाबींचाही समावेश होतो.

2. **द्वितीय स्वरूपाची सामग्री**

ज्या वेळेस अभ्यासक सामग्री स्वतः क्षेत्रात जाऊन प्राप्त करत नाही म्हणजेच सामग्री वेगवेगळया पध्दतीने मिळविली जाते, अशा सामग्रीस द्वितीय स्वरूपाची सामग्री असे म्हणतात.

द्वितीय स्वरूपाची सामग्री मिळविण्याचे स्त्रोत -

प्राथमिक स्त्रोताद्वारे प्राप्त केलेली सामग्री पृथकरण करून तयार केलेल विविध प्रबंध आणि संशोधनपर लेख

वर्तमानपत्रे, संशोधन अहवाल.

विविध संदर्भ पुस्तके

सर्वेक्षण करीत असताना प्रामुख्याने प्राथमिक स्वरूपाची सामग्री मिळविण्याचे स्त्रोत वापरण्यात आले. तसेच सर्वेक्षण अहवाल तयार करत असताना दोन्ही स्वरूपाच्या सामग्रीचा वापर करण्यात आला.

अभ्यासासाठी वापरलेल्या अभ्यासपध्दती -

1. या अभ्यासासाठी दोंदे गावास प्रत्यक्ष भेट देवून निरीक्षण केले.

2. प्रश्नावली तयार करून त्या ग्रामस्थांकडून भरून घेतल्या.

3. नमुना सर्वेक्षणासाठी 40 टक्के नमुन्यांची निवड केली.

4. भारतीय स्थलनिर्देशक नकाशांच्या साहाय्याने भूरचनेचा अभ्यास केला.

5. विविध सांख्यकीय आकृत्यांच्या सहाय्याने आकडेवारीचे विश्लेषण केले.

6. नकशा निर्मितीसाठी जीआएस, गुगल अर्थ, या तंत्राचा प्रभावीपणे उपयोग करण्यात आला

**1.6 सर्वेक्षणाची व्याप्ती -**

गाव सर्वेक्षणात कोणकोणत्या विषयांचा अभ्यास केला जातो? याचा विस्तार काय आहे याची पहाणी करणे म्हणजे गाव सर्वेक्षणाची व्याप्ती. गाव सर्वेक्षणाध्ये गावाची सर्वसाधारण माहिती, गावाचे निरपेक्ष आणि सापेक्ष स्थान, गावाची भूरचना, जलप्रणाली, हवामान, मृदा, गावाची लोकसंख्या, साक्षरता, वैवाहिक स्थिती, शैक्षणिक स्थिती, गावातील आर्थिक व्यवसाय, उत्पन्न, सामाजिक स्थिती, सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांचा गाव सर्वेक्षणात अभ्यास केला जातो.

*****************

# प्रकरण २

# दोंदे ग्राम क्षेत्र अभ्यास

## २.१ गावाचा इतिहास

दोंदे हे गाव प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. कृषी प्रधान गाव म्हणून दोंदे गावाचा नावलौकिक आहे. भीमा नदीच्या उजव्या काठावरती वसलेले हे सुंदर आणि टुमदार असे गाव आहे. बारणे आणि सुकाळे या दोन कुटुंबीयांच्या नावावरून गावाला दोंदे असे नाव पडल्याचा इतिहास सांगितला जातो. दोंदे गावाच्या वेशीवर कोहिनकर कुटुंबीयातील पूर्वजाची मूर्ती स्थापलेली दिसून येते. दोंदे गावाच्या गावठाणात जुनी पडझड झालेल्या मातीच्या विटांची घरे व जुने वाडे पाहावयास मिळतात. पिण्याचे पाणी,रस्ते,वीज या सुविधा उपलब्ध झाल्यानंतर गावठाणातील घरे शेत मळ्यात स्थलांतरित झालेली दिसतात. दोंदे गावाचे जुने गावठाण ओस पडल्याप्रमाणे दिसून येते.

## 2.2 दोंदे गावाची सर्वसाधारण माहिती-

महाराष्ट्रातील दख्खनच्या पठारावर सह्याद्रीच्या कुशीत असलेल्या पुणे जिल्हा हा विविध वैशिष्ट्यांनी समृद्ध आहे. पुणे जिल्ह्याला ज्याप्रमाणे ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे त्याच प्रकारचा संपन्न भौगोलिक वारसाही लाभलेला आहे. महाराष्ट्रातील जैवविविधता संपन्न असलेली अनेक ठिकाणी आहेत त्यापैकीच एक ठिकाण म्हणजे पुणे जिल्ह्यातील उत्तर दिशा स्थित खेड तालुका होय. या तालुक्यात एकूण 192 गावे आहेत दोन ते हे त्यापैकीच एक ऐतिहासिक वारसा लाभलेले गाव होय. दोंदे हे गाव तालुक्याच्या पश्चिमेकडील भागात वसलेले आहे.

राजगुरुनगरच्या पश्चिमेस 6 किमी अंतरावर दोंदे हे गाव वसले आहे. राजगुरुनगरवरून वडगाव मार्गे कडूस ला एक मार्ग जातो या मार्गावर राजगुरुनगर पासून पाच किमी अंतरावर दोंदे हे गाव आहे. दोंदे गावाच्या उत्तरेस भीमा नदी, दक्षिणेस किवळे व रानमळा, पूर्वेस वडगाव आणि पश्चिमेस कडूस ही गावे आहेत. दोंदे हे भीमा नदीच्या काठी वसलेले टुमदार गाव आहे. गावठाणाचे एकूण क्षेत्रफळ 9.68 हेक्टर आहे तर गावाच्या शिवाराचे एकूण 824 हेक्टर वर क्षेत्र विस्तारलेले आहे. गावाच्या दक्षिणेस ढुम्याडोंगर रांग पाहावयास मिळते. डोंगर पायथ्यापासून नदीपर्यंत विस्तृत असा मैदानाचा प्रदेश पाहावयास मिळतो. गावठाणा बरोबरच आसपासच्या विविध वाड्या वस्त्यांवर लोक वस्ती विखुरलेली दिसून येते त्यामध्ये सुकाळे वस्ती,गोटा पट्टी, सैंदाणे ठाकरवाडी,

उढाण स्थळ, दरवडे वस्ती, आवळ्याची ठाकरवाडी, तळ्याची वाडी,करंडे वस्ती, बनकर वस्ती, लगड वस्ती, कदम वस्ती,बारणेस्थळ, बौद्ध वस्ती, इ. वस्त्या दोंदे गावामध्ये आढळून येतात.

**२.३. भौगोलिक स्थान-**

भौगोलिक दृष्ट्या कोणत्याही स्थळाचे स्थान दोन प्रकारे सांगता येते एक निरपेक्ष स्थान व दुसरे सापेक्ष स्थान. निरपेक्षस्थान अक्षवृत्ते व रेखावृत्ते यांच्या संदर्भात सांगितले जाते तर सापेक्षित स्थाने आजूबाजूच्या भौगोलिक स्थितीच्या संदर्भात सांगितले जाते. दोंदे हे गाव पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात आहे. पुणे जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्रातील मध्यवर्ती ठिकाणी असलेला महत्त्वाचा जिल्हा आहे. खेड तालुका उत्तर पुणे जिल्ह्यातील एक तालुका आहे. या तालुक्याचा आकार लांबकुळा असून तो वायव्य कडून आग्नेयेकडे पसरलेला आहे. भीमाशंकर हे या तालुक्याचे वायव्यचे शेवटचे टोक असून तुळापूर जवळ भीमा- इंद्रायणीचा संगम हे आग्नेयेचे टोक आहे. वायव्येकडून आग्नेयेकडे जाताना तालुक्याचा विस्तार वाढत जातो. या तालुक्यातून भीमा व भामा या नद्या वाहत गेल्या असून आग्नेय ही त्यांच्या प्रवाहाची दिशा आहे. तालुक्याच्या उत्तरेस आंबेगाव तालुका, पूर्वेस शिरूर तालुका, दक्षिणेस हवेली तालुका, नैऋत्येस मावळ तालुका आणि पश्चिमेस रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुका आहे .

**२.४ दोंदे गावचे निरपेक्ष आणि सापेक्ष स्थान पुढीलप्रमाणे -**

**१. निरपेक्ष स्थान-**


निरपेक्ष स्थान हे अक्षवृत्ते आणि रेखावृत्ते यांच्या संदर्भात सांगितले जाते. दोंदे या गावाचे नकाशे वरील स्थान पुढीलप्रमाणे आहे. अक्षवृत्तीय स्थान - $18^{0}$ 15’ अंश उत्तर अक्षवृत्त. रेखावृत्तीय स्थान- $73^{0}$ 14’ पूर्व रेखावृत्त

**२. सापेक्ष स्थान-** सापेक्ष स्थान आजूबाजूच्या स्थानावरून सांगितले जाते. दोंदे हे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात वसले आहे. ते राजगुरुनगरच्या पश्चिमेस पाच किमी अंतरावर असून राजगुरुनगर कडूस या रस्त्यावर आहे. दोंदे गावच्या पश्चिमेस कडूस,उत्तरेस भीमा नदी, पूर्वेस वडगाव आणि दक्षिणेस किवळे व रानमळा ही ठिकाणे आहेत. हे गाव भीमा नदीच्या उजव्या काठावर वसलेले आहे.

**२.५ दोंदे गावच्या वस्त्या-** अलीकडच्या काळामध्ये गावांची प्रारूपे पालटत चाललेले आहेत. पूर्वीची सगनखेडी आता विखुरू लागलेली आहेत. कारण पूर्वी संरक्षणाचा प्रश्न, चोरांची भीती यामुळे लोक एकत्र राहत असत. सध्याच्या काळात तुलनेने ही भीती कमी झालेली आहे. त्यामुळे लोक वस्ती विखुरत आहे. तिला संयुक्त

वस्त्यांचे रूप येत आहे. दोंदेगाव हे अनेक विखुरलेल्या वस्त्यांमध्ये दिसून येते. सुकाळे वस्ती, गोटा पट्टी, सैंदाणे ठाकरवाडी,उडाणे स्थळ, दरवडे वस्ती,आवळयाची ठाकरवाडी,तळयाची वाडी, करंडे वस्ती,बनकर वस्ती, लगड वस्ती, कदम वस्ती,बारणे स्थळ,बौद्ध वस्ती अशा वस्त्यांमध्ये दोंदेगाव विखुरलेले आढळून येते.

## दोंदे गावाचा गुगल मॅपवरून घेण्यात आलेला नकाशा




*****************

# प्रकरण - ३

# प्राकृतिक रचना

### ३.१ भूपृष्ठरचना-

भूमी उपयोजनावर प्रत्यक्ष परिणाम करणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे त्या प्रदेशाची भूपृष्ठरचना होय. त्या प्रदेशातील उंच सखलपणा, उंचवटे, डोंगरकडे, खोल दरी या सर्वांमुळे त्या प्रदेशाची एक ओळख निर्माण होत असते. या सर्वांचा परिणाम मानवी जीवनावर जसा होतो तसाच तो वनस्पती, प्राणी, मृदा, हवामान यांच्यावर देखील होत असतो. खेड तालुक्याला वैविध्यपूर्ण अशी भूपृष्ठरचना लाभलेली आहे. तालुक्याचा सर्वसाधारण उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. अगदी पश्चिमेकडील बाजूस पश्चिम घाटाच्या म्हणजेच सह्याद्रीच्या पर्वत शिखर परिसरात उंची 900 मीटर पेक्षा जास्त आहे. तालुक्याच्या मध्यवर्ती प्रदेशात उंची 550 ते 900 मीटरच्या दरम्यान आहे. तर पूर्वेकडील भाग हा 550 मीटर पेक्षा कमी उंचीचा आहे. महाराष्ट्र शासनाने खेड तालुक्याला डोंगरी तालुका म्हणून मान्यता दिलेली आहे. कारण तालुक्याच्या पश्चिम भागात सह्याद्री पर्वतरांग व या पर्वतरांगेच्या उपरांगा वरसुबाई, शिंगेश्वर, वेळेश्वर यांनी तालुक्याचा बरसा भाग व्यापलेला आहे. या रांगांमधील शिंगेश्वर हे तालुक्यातील सर्वात उंच ठिकाण आहे याची उंची 1293 मीटर आहे. त्या खालोखाल कुंडेश्वर १२०६ मीटर, सांबर कडा ११२९ मीटर, सौरंगा ११२५ मीटर. ही शिखरे आहेत. खेड तालुक्याची पश्चिमेकडील सीमा पश्चिम घाटाने निश्चित केली आहे. या ठिकाणची उंची भीमाशंकर जवळ १२५० मीटर पर्यंत आहे. सह्याद्री पर्वताला वांद्रे व अंभू या ठिकाणी खिंडी आहेत. तालुक्यात भोरगिरी, मंदोशी, आव्हाट, औदर, कुडे, चिखलगाव, या परिसरात डोंगरकड्यांचा उतार तीव्र असल्याने वर्षा ऋतूत अनेक धबधबे पाहावयास मिळतात. तालुक्याच्या मध्यवर्ती भागात भीमा व भामा या नद्यांच्या दरम्यान काहीसा पठारी प्रदेश आहे वाईट कोहिंडे या गावापासून या पठाराचा उतार भीमा व भामा नद्यांच्या संगमापर्यंत कमी होत गेला आहे. तसेच पूर्वेकडील प्रदेशात चाकण, आळंदी दरम्यानचा पठारी प्रदेश वाफगाव, गुळाणी, कनेरसर या परिसरातही पठार आढळून येते तालुक्यात नद्यांच्या पात्रालगत चासकमान धरण क्षेत्राच्या खाली तसेच खेड, चाकण पासून दावडी, आळंदी, मरकळ पर्यंतचा सर्व भाग मैदानी आहे.

तालुक्यामध्ये सह्याद्री पर्वताच्या ज्या अनेक रांगा पूर्वेकडे गेलेल्या आहेत त्यापैकी खेड तालुक्याच्या उत्तरेकडील भागामधूनच पश्चिमेकडून पूर्वेकडील भागातून जी डोंगररांग गेलेली आहे त्या डोंगररांगेच्या पायथ्याला दोंदे हे गाव वसलेले आहे. गावाच्या दक्षिणेकडील बाजूला ढुम्या डोंगर आहे. ह्या डोंगर रांगेचा उतार दक्षिणेकडे

किवळे गावाकडे तर उत्तरेकडे दोंदे गावाकडे असलेला दिसून येतो. या प्रदेशाची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची 650 मीटर आहे. या डोंगराचा उतार उत्तरेकडील बाजूस भीमा नदीच्या पात्राकडे कमी कमी होत जातो त्यामुळे दोंदे गावची भूपृष्ठरचना ही उंच सखल या श्रेणीत येते.

दोंदे हे गाव भीमा नदीच्या काठी वसलेले आहे. हे गाव भीमा नदीच्या दक्षिणेस नदी काठापासून ढुम्या डोंगराच्या पायथ्या पर्यंत पसरलेले आहे. या गावाच्या पश्चिमेस रानमळा व पूर्वेस वडगाव ही गावे आहेत. दोन्ही गाव समुद्रसपाटीपासून 2260 फूट उंचीवर वसलेले आहे. गावाच्या दक्षिणेस ढुम्या डोंगररांग असून त्या रांगेची उंची २६०० फूट आहे. या डोंगर रांगेचा भाग वडगाव कडून पश्चिमेस रानमळा व कडूस कडे गेलेला आहे. या डोंगरावर सपाट माळरान आहे. वनविभागाचा जंगलाचा प्रदेश म्हणूनही त्याची ओळख आहे. या डोंगर रांगेत अनेक छोटे-मोठे जलप्रवाह उगम पाहून दोंदे गावाच्या दिशेने ओढ्याच्या रूपाने वाहत येऊन भीमा नदीच्या उजव्या काठावर येऊन मिळतात. दोंदे गावचा दक्षिणेकडील भाग डोंगराळ प्रदेशाने आणि दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला आहे. या डोंगर रांगेवरती सामाजिक वनीकरण विभागाने वृक्ष लागवड केलेली आहे. दक्षिणेकडून उत्तरेकडे यावे तसतशी प्रदेशाची उंची कमी कमी होत जाते. डोंगराळ भाग संपल्यानंतर गाळाचा सुपीक मैदानी भाग भीमा नदीच्या काठापर्यंत पसरलेला आहे. दोंदे गावची भूरचना काहीशी ओबडधोबड आणि मोठ्या प्रमाणात सपाट मैदानी आहे. खालील नकाशामध्ये भूउठाव दिसून येत आहेत.

**३.२ जलप्रणाली-**

खेड तालुक्याचा भाग हा कृष्णा नदीची उपनदी असलेल्या भीमा खोऱ्याचा आहे भीमा नदीचा उगम या तालुक्यामधील भीमाशंकर येथे एक हजार पंधरा मीटर उंचीवर होतो भीमा ही तालुक्यातील प्रमुख पूर्ववाहिनी नदी आहे भीमा नदीशिवाय भामा इंद्रायणी वेळ कुमंडला आरळा येरळा या नद्याही तालुक्यातून वाहतात यापैकी भामा नदीचा उगम पश्चिम घाटातील पडरवाडी या गावाजवळ होतो पुढे ही नदी सेल पिंपळगाव जवळ भीमा नदीस मिळते या नदीवर करंज विहिरी या गावाजवळ भामा आसखेड या नावाने धरण बांधण्यात आले आहे इंद्रायणी नदी तालुक्याची दक्षिण सीमा निश्चित करते व पुढे तुळापूर या ठिकाणी भीमा नदीस मिळते वेळ ही आंबेगाव तालुक्यातील वेळेश्वर येथे उगम पावते सातगाव पठार प्रदेशातून वाहत जाऊन तालुक्यातील पूर्वेकडील वापगाव वरुडे कनेरसर या गावांमधून वाहते याशिवाय आरळा नदी सह्याद्रीच्या माथ्यावर तांबडेवाडी येथे उगम पावते व वाडा गावाजवळ भीमा नदीस मिळते आरळा नदीस चिखलगाव जवळ येरळा नदी येऊन मिळते आरळा या

नदीवरही कळमोडी येथे एक धरण बांधण्यात आले आहे याशिवाय शिंगेश्वर डोंगरावर उगम पावणारी व पूर्वेकडे वाहणारी कुमंडला नदी दोंदे गावाजवळ भीमा नदीस मिळते.

दोंदे गावच्या क्षेत्रामध्ये ढुम्या डोंगर रांगेतून अनेक प्रवाह उगम पावतात आणि उत्तरेकडे येऊन भीमा नदीस मिळतात यापैकी सैंदाणे ठाकरवाडी परिसरातून वाहत येणारा ओढा व त्या ओढ्यास येऊन मिळणारा उडणस्थळ परिसरातील प्रवाह तसेच आवळीचा प्रवाह कोहिनकर वस्तीजवळ एकत्र येऊन पुढे गावाच्या पूर्वेस नदीच्या उजव्या काठावरती येऊन मिळतात. गावाच्या पश्चिमेस वाहणारा जलप्रवाह हा बारणेस्थळाच्या जवळ भीमा नदीस येऊन मिळतो. कडूस कडून वाहत येणारा कुमंडला नदीचा प्रवाह दोंदे गावाच्या उत्तर सीमेलगत भीमा नदीस येऊन मिळतो. या सर्व प्रवाहांचा एक वृक्ष आकार जलप्रणाली स्वरूपात विकास झालेला दिसतो.

**३.३ मृदा-**

मृदा हा शेती व्यवसायावर परिणाम करणारा मूलभूत घटक आहे. कोणत्याही प्रदेशातील मृदेचे स्वरूप आणि गुणधर्म त्या प्रदेशातील भौगोलिक रचना आणि हवामान यावर अवलंबून असते. खेड तालुक्याचा बराचसा भाग हा शीलारसाच्या संचनापासून तयार झालेला असल्यामुळे बेसॉल्ट या खडकापासून तयार झालेली काळी मृदा तालुक्यात सर्वत्र आढळते. परंतु पर्जन्य व तापमानातील बदलामुळे या मृदेच्या रंगांमध्ये व रासायनिक गुणधर्मांमध्ये प्रादेशिक भिन्नता आढळून येते. पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना ही बदल ठळकपणे जाणवतात. सह्याद्रीच्या पर्वताच्या अति पर्जन्य असलेल्या परिसरात वांद्रे, आडगाव, आंभू,भलवडी, आढे, आंबोली, वाघू, भोरगिरी, भीमाशंकर या पश्चिम पट्ट्यात जांभी (लेटेराईट )प्रकारची मृदा आढळते. जास्त पावसामुळे मूळच्या काळया मृदेत बदल होऊन या मृदेची निर्मिती झालेली आहे. तालुक्याच्या मध्यवर्ती पठारावर साधारण तपकिरी रंगाची मृदा आढळते. नद्यांच्या पात्रालगच्या प्रदेशात आणि पूर्वेकडील मैदानी प्रदेशात काळया मृदेचे प्रमाण सर्वाधिक आहे. तालुक्यातील डोंगरकड्याच्या उतारावर व पायथ्यालगत मुरमाड व पांढुरक्या मृदेचा आढळ जाणवतो. मृदेतील या विविधतेमुळे तालुक्यामध्ये पीकविविधता आढळून येते नदीपात्र लगतच्या व मैदानी काळामृद्धीच्या परिसरात पाण्याच्या मुबलकतेमुळे भाजीपाल्याची व बागायती पिके घेतली जातात. पठारावरील प्रदेशात पर्जन्यधारीत खरिपाची व रब्बीची पिके घेतली जातात यामध्ये बाजरी, भुईमूग, ज्वारी याबरोबरच पावसाळी बटाट्याची पिक पाईट, कोहिंडे परिसर तसेच गुळणी, वाफगाव, कनेरसर या परिसरात मोठ्या प्रमाणात घेतले जाते पश्चिमेकडील जास्त पर्जन्याच्या प्रदेशात भात, नाचणी ही प्रमुख पिके घेतली जातात. दोंदे गावच्या परिसरामध्ये मृदेमध्ये वैविध्य आढळून येते. दोंदे गावच्या दक्षिणेकडील डोंगरावर साधारण तपकिरी रंगाची व

मुरमाड मृदा आढळून येते. दक्षिणेकडून उत्तरेकडे भीमा नदीच्या पात्राकडे जाताना मृदेमध्ये बराचसा बदल आढळून येतो. ओढ्याच्या खोऱ्यात तसेच नदी लगतच्या सपाट मैदानी प्रदेशात काळी मृदा मुबलक प्रमाणात आढळून येते. या मृदेमध्ये वर्षभर विविध बागायती पिके घेतली जातात.

**३.४ हवामान-**

हवामान हा भौगोलिक आर्थिक व सामाजिक घटकांवर परिणाम करणार अतिशय महत्त्वाचा घटक असतो. तालुक्यातील हवामान ढोबळमानाने उष्णकटिबंधीय मोसमी हवामान या प्रकारात मोडते. परंतु सह्याद्री पर्वताचे सानिध्य लाभल्यामुळे पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना हवामानामध्ये बदल होत गेला आहे. हवामानाचे दर्शक म्हणून पर्जन्य व तापमान या घटकांचा विचार करावा लागतो. वर्षा ऋतूमध्ये साधारणपणे जून ते ऑक्टोबर महिन्यात सर्वाधिक म्हणजे 85 टक्के पाऊस पडतो. तालुक्यातील सह्याद्रीचे सानिध्य असलेल्या वांद्रे, आडगाव, आंभू, तोरणे, भलवडी, आढे,आंबोली, वाघू, भोरगिरी, भीमाशंकर या परिसरात सरासरी 218 इंचापेक्षा जास्त पाऊस पडतो. येथून पूर्वेकडे वाडा, पाईट या पट्ट्यात पाऊस कमी होऊन सरासरी 144 इंच होतो. हाच पाऊस तालुक्याच्या पूर्वेकडील पट्ट्यात साधारण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 54 च्या पूर्वेकडे सरासरी 75 ते 100 इंच इतकाच पडतो .तालुक्याचे वार्षिक सरासरी तापमान 32 अंश ते 38 अंश सेल्सिअसच्या दरम्यान आढळते. तापमान देखील पूर्वेकडे जाताना वाढत जाते. पर्जन्याने तापमान यांच्यातील फरकामुळे वनस्पती व कृषी यामध्ये पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना बदल होतो. दोंदे गावचे हवामान हे मोसमी असून येथे जून ते सप्टेंबर या काळात नैऋत्य मान्सून वाऱ्यांपासून पाऊस मिळतो. ईशान्य मान्सून वाऱ्यांपासून मिळणाऱ्या पावसापेक्षा नैऋत्य मान्सून पासून अधिक पाऊस मिळतो. येथील टेकड्यांवर जास्त पाऊस पडतो. पावसाचे प्रमाण 67 सेमी आहे. सप्टेंबर नंतर पावसाचे प्रमाण कमी होते .ईशान्य मान्सून पासून तुरळक पाऊस मिळतो. हिवाळे थंड व कोरडे असतात .उन्हाळयातील कमल तापमान 40°से.असून हिवाळयातील किमान तापमान ८ अंश से.असते.

**३.५ वनस्पती-**

दोंदे गावाच्या बाजूने डोंगराळ प्रदेश असल्याने तसेच शेजारील नदीचा परिसर व पावसाचे प्रमाण जास्त असल्याने डोंगराच्या उतारावर पायथ्याशी जंगले असलेली दिसून येतात. सामाजिक वनीकरणातून शासनाने संरक्षित जंगल निर्माण केलेले आहे. या व्यतिरिक्त ओढ्याचे काठ, शेताचे बांध येथेही वृक्ष उगवलेले आढळतात. माळरानावर गवत वाढलेले आहे.

येथील वने उष्णकटिबंधीय पानझडी वने आहेत. या वनांना वसंत ऋतू पालवी फुटते. पावसाळ्यात व हिवाळ्यात फेब्रुवारी महिन्यापर्यंत ही वने हिरवीगार असतात. नंतर शिष्य ऋतू वृक्ष पाने गाळतात. या गावांमध्ये वड, निलगिरी, पिंपळ, अशोक, साग, हिवर, खैर, कडुनिंब, आपटा, अंजन, बदाम, आंबा, बोरी, जांभूळ, केळी, चिंचा, उंबर, चाफा, सुबाभूळ, हिरडा, शेवगा, पेरू, टणटणी इत्यादी वृक्ष आहेत

**३.६ प्राणी आणि पक्षी-**

दोंदे या गावांमध्ये तसेच आसपासच्या परिसरात विविध प्राणी व पक्षी आढळून येतात यापैकी काही प्राणी पुढील प्रमाणे सांगता येतील कावळे, चिमण्या, घारी, गिधाड, घुबड, वटवाघुळे, कोल्हे, लांडगे तरस खोकड साप तसेच परिसरात ससा, भेकर, खोकड, ऊद मांजर, वानर, रानडुक्कर, तरस, बिबट्या ही प्राणी तर नाग, मण्यार, घोणस, फुरसे, चापडा, मांजरा, खापरखवल्या, पहाडी तस्कर, धामण, अजगर या सापाच्या जाती आढळतात. याशिवाय पक्षांमध्ये मोर, भारद्वाज, वेडा राघू, पानकावळा, रातवा, मंचक, मराठा सुतार इत्यादी आढळतात. अलीकडच्या काळात नरभक्षक बिबट्यांना पकडण्यासाठी ठाकरवाडी परिसरात पिंजरे लावलेले दिसून येतात.

**३.७ वाहतूक व दळणवळण-**

खेड तालुक्यामध्ये वाहतुकीचे प्रमुख माध्यम रस्ते हेच आहे. तालुक्यामध्ये एकूण पाच प्रकारचे रस्त्यांचे प्रकार आढळतात. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 55 पुणे ते नाशिक यांना जोडणारा हा रस्ता चाकण राजगुरुनगर येथून जातो. या रस्त्याची तालुक्यातील लांबी 21 किलोमीटर आहे. त्याचप्रमाणे 54 व 55 क्रमांकाचे दोन राज्य महामार्ग तालुक्यातून गेलेले आहेत. यापैकी राज्य महामार्ग क्रमांक 54 शिरूर ते भीमाशंकर याची तालुक्यातील लांबी 67 किलोमीटर आहे. तर राज्य महामार्ग क्रमांक 55 शिक्रापूर ते तळेगाव दाभाडे या रस्त्याची तालुक्यातील लांबी 38 किलोमीटर आहे. याशिवाय जिल्हा रस्ते तालुका पातळीवरील रस्त्यांनी तालुक्यातील महत्त्वाची बाजारपेठांची ठिकाणी जोडलेली आहेत. या प्रमुख रस्त्यांमध्ये राजगुरुनगर ते पाईट आंबोली रस्ता राजगुरुनगर ते कडूस औदर कुडा रस्ता चाकण आंबेठाण करंज विहिरी रस्ता हे प्रमुख रस्ते आहेत. महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीच्या परिसरातही मोठ्या प्रमाणात नवीन रस्ते उभारणीचे काम सुरू आहे.तालुक्यामध्ये वीज व टेलिफोनचे जाळे गावापर्यंत विकसित झालेले आहे याद्वारे संदेशवहन अतिशय जलद गतीने होते. महाराष्ट्र नॅचरल गॅस वाहिनीची एक शाखा चाकण औद्योगिक वसाहतीमध्ये आलेली आहे.

दोंदे हे गाव राजगुरुनगर ते कडूस या रस्त्यावर चार किलोमीटर अंतरावर आहे. हा रस्ता या गावातील मुख्य रस्ता आहे. या रस्त्यापासून सैदाणे ठाकरवाडी तसेच उढान स्थळ या दोन वस्त्यांना डांबरी रस्त्याने जोडलेले

आहे. बारणे वस्ती आणि गावास जोडणारा रस्ता डांबरीकरण करण्यात आलेला आहे.दोंदे गावठाणाच्याअंतर्गत सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटचे बांधण्यात आलेले आहेत. स्मशानभूमी व दशक्रिया घाटाकडेही पक्के रस्ते निर्माण केलेले आहेत. त्याचप्रमाणे गावातील प्रत्येक वस्तीस जोडणारा पानंद रस्ता आहे.

*****************

# प्रकरण चौथे
# सामाजिक घटक

## 4.1 लोकसंख्या

भूगोलाच्या अभ्यासकाला कोणत्याही भूप्रदेशाचा अभ्यास करताना मानवी घटकांचाही विचार करावा लागतो. लोकसंख्या हा मानवी घटकातील महत्त्वाचा घटक आहे. या अभ्यासामध्ये निमगाव या खेड्यातील लोकसंख्येचा व लोकसंख्या वैशिष्ट्यांचा अभ्यास केलेला आहे. या अभ्यासामध्ये 240 कुटुंबांचा अभ्यास केलेला आहे. हे नमूना सर्वेक्षण 40 टक्के आहे. या अभ्यासात लोकसंख्या विषयक पुढील वैशिष्ट्यांचा समावेश केलेला आहे.


## 4.2 धर्मनिहाय वितरण -

**दोंदे गावातील लोकांची धर्मनियाह लोकसंख्या पुढील प्रमाणे**

**तक्ता क्रमांक – 1. दोंदे गावातील विविध धर्मिय लोकसंख्या टक्केवारी**

| अ. नं. | धर्म | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | हिंदू | 94.88 |
| 2 | मुस्लिम | 2.33 |
| 3 | ख्रिश्चन | 0.00 |
| 4 | बौध्द | 3.26 |
| 5 | जैन | 0.00 |
| 6 | शिख | 0.00 |
| 7 | इतर | 0.00 |

**आलेख क्रमांक - 1. दोंदे गावातील विविध धर्मिय लोकसंख्या टक्केवारी**



वरील आलेखाचे निरिक्षण केले असता आपल्या लक्षात येते की दोंदे गावमध्ये हिंदूधर्मीय लोकांची संख्या खूपच जास्त म्हणजे सुमारे 94.88 टक्के आहे. इस्लाम आणि बौद्धधर्मीय लोकांचे प्रमाण 3 टक्क्याहून कमी आहे. तर इतर धर्मिय लोकांचे प्रमाण अतिशय नगण्य आहे.


### 4.3 जातीनिहाय लोकसंख्या

खालील तक्त्याचे निरीक्षण केले असता आपणास दोंदे गावातील जातीने आहे लोकसंख्या व त्याची टक्केवारी पुढील प्रमाणे दोंदे गावांमध्ये 55.81% मराठा समाजाचे म्हणजेच खुल्या गटातील लोक आहे. इतर मागासवर्गीय समाजातील 18.60% लोक आहेत. यामध्ये प्रामुख्याने माळी समाजाचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे एस सी कॅटेगरीतील 5.12 टक्के लोकसंख्या आढळून येते यामध्ये बौद्ध आणि चर्मकार समाजातील लोकांची संख्या आहे. ती एसटी कॅटेगिरी मध्ये प्रामुख्याने ठाकर समाजातील लोकांचे प्रमाण सर्वाधिक असून सैंदाणे ठाकरवाडी येथे हे लोक राहतात यांचे प्रमाण 20.47% इतके आहे. तर इतर भटक्या विमुक्त समाजातील लोकांचे प्रमाण केवळ 0.47% आहे.

**तक्ता क्रमांक – 2. दोंदे गावातील विविध जातीनिहाय लोकसंख्या टक्केवारी**

| अ. नं. | जात | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | OPEN | 55.81 |
| 2 | OBC | 18.60 |
| 3 | SC | 5.12 |
| 4 | ST | 20.47 |
| 5 | NT | 0.47 |

**आलेख क्रमांक - 2. दोंदे गावातील जाती नुसार लोकसंख्येची विभागणी**




### 4.4 कुटुंब पद्धती

महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने एकत्र कुटुंब पद्धती आणि विभक्त कुटुंब पद्धती अशी कुटुंबाची रचना असल्याची दिसून येते. शहरी भागांमध्ये प्रामुख्याने विभक्त कुटुंब पद्धती आढळते तर ग्रामीण भागामध्ये एकत्र कुटुंब पद्धती अधिक प्रमाणात आढळून येते. दोंदे गावांमध्ये देखील याचा प्रभाव आढळून येतो. दोन ते गावांमध्ये साधारण 62.33% कुटुंबे एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये राहत असल्याचे आढळून येते. तर 38.34% कुटुंबे ही विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये राहत असल्याचे आढळतात.

**तक्ता क्रमांक – 3. दोंदे गावातील कुंटब पध्दती**

| अ. नं. | कुंटूब पध्दती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | एकत्र | 62.33 |
| 2 | विभक्त | 38.34 |

**आलेख क्रमांक - 3. दोंदे गावातील कुटुंब पद्धती**





### 4.5 दोंदे गावातील कुटुंबाचा आकार

**तक्ता क्रमांक – 4. दोंदे गावातील कुंटुबातील सदस्यांची संख्या**

| अ. नं. | कुंटुबातील सदस्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 0 - 2 | 3.37 |
| 2 | 3- 4 | 26.71 |
| 3 | 5- 6 | 34.55 |
| 4 | 7-8 | 19.69 |
| 5 | 9-10 | 11.49 |
| 6 | 10+ | 4.19 |

खालील सारणीचे आणि आलेखाचे निरीक्षण केले असता आपणास असे दिसून येते की दोंदे गावांमध्ये कुटुंबातील सदस्यांची संख्या विचारात घेतले असता आपणास असे आढळून येते की, पाच ते सहा सदस्य असलेल्या कुटुंबांची संख्या सर्वाधिक म्हणजेच 34.55% आहे. त्या खालोखाल तीन ते चार सदस्य असलेल्या कुटुंबांची संख्या 26.71% आहे. सात ते आठ सदस्यांची संख्या असलेल्या कुटुंबांचे प्रमाण 19.69% आहे. दोन किंवा त्याहून कमी सदस्य असलेल्या कुटुंबांची संख्या 3.37% आहे. 9 ते 10 सदस्य असलेल्या कुटुंबांचे प्रमाण 11.49% आहे तर दहा पेक्षा जास्त सदस्य असलेल्या कुटुंबांचे प्रमाण 4.19% इतकेच आहे.

**आलेख क्रमांक - 4. दोंदे गावातील कुटुंबातील सदस्यांची संख्या**





### 4.6 दोंदे गावातील स्त्री पुरुष प्रमाण

खालील सारणी आणि आलेखाचे निरीक्षण केले असता आपणास असे दिसून येते की तोंदे गावांमध्ये पुरुषांच्या प्रमाणात स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे आढळून येते. दोंदे गावांमध्ये स्त्रियांची एकूण संख्या 515 तर पुरुषांची एकूण संख्या 563 इतकी आढळून येते टक्केवारी मध्ये हे प्रमाण पाहिल्यास स्त्रियांचे प्रमाण 47.77% तर पुरुषांचे प्रमाण 52.23% इतके असल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 5. दोंदे गावातील स्त्रि पुरूष प्रमाण टक्केवारी**

| अ. नं. | स्त्रि पुरूष | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कुंटुंबातील स्त्रियांची एकूण संख्या | 47.77 |
| 2 | कुंटुंबातील पुरूषांची एकूण संख्या | 52.23 |

**आलेख क्रमांक - 5. दोंदे गावातील स्त्री पुरुष प्रमाण**





**4.7 दोंदे गावातील वयोगट रचना ( कुटुंबातील सदस्य संख्येनुसार)**

खालील सारणी आणि आलेखामध्ये दोंदे गावातील कुटुंबातील वयोगट रचना विचारात घेतलेली आहे. या ठिकाणी किती टक्के कुटुंबामध्ये वयोगट रचनेनुसार विभाजन झालेले आहे हे तपासून पाहण्यात आलेले आहे. वयोगट रचनेचे तीन गट पाडले असतात आपणास असे दिसून येते की 14 पेक्षा कमी वयोगट असलेल्या लोकांचे प्रमाण 49.77%. 15 ते 59 या वयोगटांमध्ये 96.28% तर 60 पेक्षा जास्त वयोगटात 51.16% इतके लोक आढळून येतात. थोडक्यात दोंदे गावांमध्ये अवलंबिता भार तपासून पाहिला असता वर्किंग पॉप्युलेशन सर्वाधिक असल्याची आढळून येते.

**तक्ता क्रमांक – 6. दोंदे गावातील वयोगट रचना Family**

| अ. नं. | वयोगट रचना | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 14 > | 49.77 |
| 2 | 15-59 | 96.28 |
| 3 | 60 < | 51.16 |

**आलेख क्रमांक - 6. दोंदे गावातील वयोगट रचना**




### 4.8 दोंदे गावातील वयोगट रचना ( एकूण लोकसंख्येनुसार)

दोंदे गावातील एकूण लोकसंख्येचा विचार केला असता असे दिसून येते की वयोगट रचनेमध्ये कष्टकरी वर्गातील म्हणजेच 15 ते 59 या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण 68.81% आहे 14 पेक्षा कमी वयोगटांमध्ये 16.68% तर 60 पेक्षा जास्त वयोगटामध्ये 14.51% इतकी लोकसंख्या आढळते.

**तक्ता क्रमांक – 7. दोंदे गावातील वयोगट रचना Population**

| अ. नं. | वयोगट रचना | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 14 > | 16.68 |
| 2 | 15-59 | 68.81 |
| 3 | 60 < | 14.51 |

**आलेख क्रमांक - 7. दोंदे गावातील वयोगट रचना**





### 4.9 दोंदे गावातील साक्षरता प्रमाण

**तक्ता क्रमांक – 8. दोंदे गावातील साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती**

| अ. नं. | साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | निरक्षर | 23.24 |
| 2 | पहिली ते पाचवी | 16.87 |
| 3 | सहावी ते दहावी | 20.91 |
| 4 | अकरावी ते बारावी संख्या | 19.19 |
| 5 | पदवी | 11.88 |
| 6 | पदव्युत्तर | 5.77 |
| 7 | इतर टेक्नीकल | 2.15 |

खालील सारणीत दोंदे गावातील साक्षरता प्रमाणाची माहिती देण्यात आलेली आहे. दोंदे गावांमध्ये साक्षरतेची पातळी 75% हून अधिक आहे. केलेल्या सर्वेक्षणा दरम्यान निरक्षर लोकांचे प्रमाण 23.24% आढळून आले. इयत्ता पाचवी पर्यंत शिक्षण झालेल्या लोकांचे प्रमाण 16.87% सहावी ते दहावीपर्यंत शिक्षण झालेल्या लोकांचे प्रमाण 20.91%, अकरावी व बारावी शिक्षण झालेले लोकांचे प्रमाण 19.19%, पदवीपर्यंत शिक्षण झालेले लोकांचे प्रमाण 11.88% पदव्युत्तर शिक्षण झालेल्या लोकांचे प्रमाण 5.77% तर इतर टेक्निकल शिक्षण झालेल्या लोकांचे प्रमाण दोन पॉईंट पंधरा टक्के आढळून आले आहे.

**आलेख क्रमांक - 8. दोंदे गावातील साक्षरता आणि शैक्षणिक स्थिती**





## 4.10 दोंदे गावातील वैवाहिक स्थिती

खालील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे आढळून येते की, एकूण लोकसंख्येपैकी कुटुंबातील विवाहित सदस्यांची संख्या **41.23%** तर कुटुंबातील अविवाहित सदस्यांची संख्या **58.77%** असल्याचे आढळून आले आहे. दोंदे गावांमध्ये विवाहाचे वय उलटून गेलेल्या मुलांचे प्रमाण लक्षणीय असल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 9. दोंदे गावातील कुंटूंबातील वैवाहीक स्थिती**

| अ. नं. | वैवाहीक स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कुंटूंबातील विवाहित सदस्यांची संख्या | **41.23** |
| 2 | कुंटूंबातील अविवाहित सदस्यांची संख्या | **58.77** |

**आलेख क्रमांक - 9. दोंदे गावातील कुंटूंबातील वैवाहीक स्थिती**





### 4.11 दोंदे गावातील निवासाचे स्थान

दोंदे हे गाव तालुक्याच्या ठिकाणापासून म्हणजेच राजगुरुनगर पासून पश्चिमेकडे सहा किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. कडूस ला जाणाऱ्या रस्त्यावर भीमा नदी काठावर हे गाव वसलेले आहे. दोंदे हे गाव मुख्य गाव म्हणजेच गावठाण वाड्या वस्त्यांमध्ये विभागलेले आहे. यापैकी सर्वेक्षणामधील **37.21%** लोक गावठाणा मध्ये राहतात तर, उडान स्थळ सैंदाणे ठाकरवाडी बारणे वस्ती सुकाळे वस्ती या वस्त्यांवर उर्वरित लोक राहत असल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 10. दोंदे गावातील निवासाचे स्थान**

| अ. नं. | निवासाचे स्थान | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | गावठाण | **37.21** |
| 2 | वाडी | **32.40** |
| 3 | वस्ती | **17.27** |

**आलेख क्रमांक - 10. दोंदे गावातील निवासाचे स्थान**




### 4.12 दोंदे गावातील स्थलांतर

दोंदे हे गाव तालुक्यापासून जवळ असल्याने तसेच वाहतूक आणि दळणवळणाच्या सुविधा उत्तम प्रकारच्या असल्याने स्थलांतराचे प्रमाण कमी आहे. गावांमधून स्थलांतर झालेल्या कुटुंबातील व्यक्तींचे प्रमाण म्हणजेच ज्या कुटुंबातून स्थलांतर झाले आहे अशा कुटुंबांचे प्रमाण 15.35% इतके आहे तर कुटुंबातून एकाही सदस्याचे स्थलांतर झाले नाही अशा कुटुंबांचे प्रमाण ८४.६५ टक्के इतके आहे.

**तक्ता क्रमांक – 11. दोंदे गावातील नोकरी निमित्त झालेले स्थलांतर**

| अ. नं. | स्थलांतर | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | स्थलांतर न झालेल्या कुंटूंबाची संख्या | **84.65** |
| 2 | स्थलांतर झालेल्या कुंटूंबाची संख्या | **15.35** |

**आलेख क्रमांक - 11. दोंदे गावातील नोकरी निमित्त झालेले स्थलांतर**




*****************

# प्रकरण पाचवे

# आर्थिक घटक


### 5.1.1 दोंदे गावातील कुटुंबातील व्यक्तींचा प्रमुख व्यवसाय

खालील तक्ता क्रमांक 11 आणि 12 मध्ये दोंदे गावातील लोकांचे व्यावसायिक विभाजन दर्शवण्यात आलेले आहे हे विभाजण दर्शवत असताना कुटुंबात काम करणाऱ्या लोकांचा व्यवसाय तसेच कुटुंबाचा व्यवसाय या अनुषंगाने हे विभाजन करण्यात आलेले आहे. दोन्ही गावांमध्ये कुटुंबातील व्यक्तींचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याचे आढळून आले आहे जवळ जवळ 42.12% लोक शेती हा प्रमुख व्यवसाय करताना आढळून आले आहेत. शेतीबरोबरच शेतीपूरक इतर व्यवसाय देखील दोंदे गावांमध्ये केले जातात. यामध्ये पशुपालन मासेमारी उद्योग व्यापार नोकरी यांचा समावेश होतो. . गावातील लोकांचे शेतीक्षेत्र कमी असल्याने आपल्या शेतीची कामे उरकल्यानंतर इतरांच्या शेतामध्ये शेतमजुरी करण्यावरती लोकांचा भर अधिक असल्याचे दिसून येते त्यामुळे शेतीबरोबरच शेतमजुरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण 16.11% असल्याचे आढळून आले आहे. याशिवाय शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालन करणाऱ्या लोकांचे प्रमाण देखील 13.88% इतके आहे तर शेतीबरोबरच नोकरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण देखील 14.59% इतके आहे. यामधील अनेक लोक राजगुरुनगर आणि चाकण परिसरातील औद्योगिक क्षेत्रामध्ये तात्पुरत्या किंवा हंगामी स्वरूपामध्ये नोकरी करताना आढळून आले आहेत.

**तक्ता क्रमांक – 12. दोंदे गावातील कुंटूबातील कुंटूब प्रमुख व्यवसाय**

| अ. नं. | कुंटूबाचा प्रमुख व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | शेती | **42.12** |
| 2 | शेतमजूरी | **16.71** |
| 3 | पशूपालन | **13.88** |
| 4 | मासेमारी | **5.41** |
| 5 | उद्योग | **4.24** |
| 6 | व्यापार | **3.06** |
| 7 | नोकरी | **14.59** |

**आलेख क्रमांक - 12. कुंटूब प्रमुख व्यवसाय**




### 5.1.2 दोंदे गावातील व्यावसायिक रचना

दोंदे गावांमध्ये व्यावसाय करणाऱ्या लोकांचे प्रमाण **36.33%,** शेतमजुरी करणाऱ्या लोकांचे प्रमाण **21.48%,** पशुपालन करणाऱ्या सदस्यांची संख्या **17.13%,** ठाकर तसेच कातकरी समाजाचे लोक राहत असल्याने मासेमारी करणाऱ्या लोकांचे प्रमाण **3.35%,** उद्योग आणि व्यापार करणाऱ्या लोकांचे प्रमाण अनुक्रमे **3.07** आणि **3.64%,** नोकरी करणाऱ्या सदस्यांची संख्या **6.50%** तर इतर प्राथमिक व्यवसाय करणाऱ्या सदस्यांची संख्या **8.49%** इतकी आहे.

**तक्ता क्रमांक – 13. दोंदे गावातील लोकसंख्येची व्यावसायिक रचना**

| अ. नं. | व्यवसाय | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | व्यवसाय करणाऱ्या सदस्यांची संख्या | **36.33** |
| 2 | शेतमजूरी करणा-या सदस्यांची संख्या | **21.48** |
| 3 | पशूपालन करणा-या सदस्यांची संख्या | **17.13** |
| 4 | मासेमारी करणा-या सदस्यांची संख्या | **3.35** |
| 5 | उद्योग करणा-या सदस्यांची संख्या | **3.07** |
| 6 | व्यापार करणा-या सदस्यांची संख्या | **3.64** |
| 7 | नोकरी करणा-या सदस्यांची संख्या | **6.50** |
| 8 | इतर प्राथमिक व्यवसाय करणा-या सदस्यांची संख्या | **8.49** |

**आलेख क्रमांक - 13. दोंदे गावातील लोकसंख्येची व्यावसायिक रचना**




### 5.2 दोंदे गावातील नोकरीत असलेल्या सदस्यांची संख्या

दोंदे गावांमध्ये हंगामी किंवा तात्पुरत्या किंवा कायमस्वरूपी नोकरीत असणाऱ्या सदस्यांचे प्रमाण **9%** च्या आसपास आहे. यामधील कायमस्वरूपी ज्या कुटुंबातील सदस्य नोकरीत आहे अशा कुटुंबांचे प्रमाण **17.42%.** तात्पुरत्या स्वरूपात नोकरीत असणाऱ्या कुटुंबातील सदस्यांची संख्या **13.60%,** हंगामी स्वरूपात नोकरीत असणाऱ्या सदस्यांची संख्या **16.95%,** सरकारी नोकरीत असणाऱ्या कुटुंबातील सदस्यांची संख्या **2.39%** खाजगी स्वरूपात नोकरीत असणाऱ्या सदस्यांची संख्या **13.37%,** सहकारी संस्थेत नोकरीत असणाऱ्या सदस्यांची संख्या **0.24** टक्के तर स्वतःचा व्यवसाय असणाऱ्या सदस्यांची संख्या जवळ जवळ **34.61** टक्के असल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 14. दोंदे गावातील नोकरीत असलेल्या लोकसंख्येची स्थिती**

| अ. नं. | नोकरीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कायम नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्यांची संख्या | **17.42** |
| 2 | तात्पुरत्या नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्यांची संख्या | **13.60** |
| 3 | हंगामी नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्यांची संख्या | **16.95** |
| 4 | सरकारी नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्यांची संख्या | **2.39** |
| 5 | दोंदे सरकारी नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्यांची संख्या | **1.43** |
| 6 | खाजगी नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्यांची संख्या | **13.37** |
| 7 | सहकारी संस्थेत नोकरीत असणा-या कुंटूबातील सदस्यांची संख्या | **0.24** |
| 8 | स्वतःचा व्यवसाय असणा-या कुंटूबातील सदस्यांची संख्या | **34.61** |

**आलेख क्रमांक - 14. दोंदे गावातील नोकरीत असलेल्या लोकसंख्येची स्थिती**




### 5.3 दोंदे गावातील जमिनीबाबत मालकी हक्क

दोंदे हे गाव ग्रामीण भागात असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या वाट्याला थोडी बहुत जमीन असल्याचे आढळून येते. सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांपैकी जवळजवळ 90.70% कुटुंबांकडे स्वतःच्या मालकी हक्काची जमीन असल्याचे आढळून आले आहे तर. गावातील भटक्या विमुक्त अनुसूचित जाती जमातीच्या लोकांकडे कुटुंबामध्ये 9.30% कुटुंबांकडे अजिबातच जमीन नसल्याची नोंद झाल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 15. दोंदे गावातील मालकी हक्काच्या जमिनीबाबत स्थिती**

| अ. नं. | मालकी हक्काची जमिन | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | **90.70** |
| 2 | नाही | **9.30** |

**आलेख क्रमांक - 15. दोंदे गावातील मालकी हक्काच्या जमिनीबाबत स्थिती**





### 4.12 दोंदे गावातील जमीन मालकी हक्क एकर मध्ये

सर्वसाधारणपणे गावाचा आकार लहान असल्याने एक एकर होऊन कमी जमीन असलेल्या लोकांची टक्केवारी सर्वाधिक असल्याचे आढळून आले आहे. स्वतःच्या मालकी हक्काची परंतु एक एकर होऊन कमी जमीन असलेल्या लोकांची टक्केवारी **37.67%** आढळून आले आहे. याबाबत विवेचन तक्ता क्रमांक **16** मध्ये करण्यात आलेले आहे. एक ते दोन एकर जमीन क्षेत्र असलेल्या कुटुंबांचे प्रमाण ३३.२ टक्के असल्याचे आढळून आले आहे तीन ते पाच एकर जमीन असणाऱ्या लोकांचे प्रमाण **20.47%** तर पाच एकर होऊन जास्त क्षेत्र असलेल्या लोकांचे प्रमाण **8.84%** असल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 16. दोंदे गावातील मालकी हक्काच्या जमिनीबाबत स्थिती (एकरमध्ये)**

| अ. नं. | स्वत:च्या मालकी हक्काची अंदाजे जमिनी | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | एक एकरपेक्षा कमी | **37.67** |
| 2 | 1 ते 2 एकर | **33.02** |
| 3 | 3 ते 5 एकर | **20.47** |
| 4 | 5 एकरपेक्षा जास्त | **8.84** |

**आलेख क्रमांक - 16. मालकी हक्काच्या जमिनीबाबत स्थिती (एकरमध्ये)**





## 5.5 दोंदे गावातील जलसिंचन

खालील तक्त्यामध्ये दोंदे गावातील शेतीसाठी जलसिंचनाची सुविधा असल्याबाबतची माहिती देण्यात आलेली आहे. दोंदे हे गाव भीमा नदीच्या तीरावर वसलेले असल्याने तसेच गावांमधून चासकमान धरणाचा उजवा कॅनॉल गेला असल्याने जलसिंचनाच्या सुविधा उत्तम आहेत. दक्षिणेकडील डोंगराळ भाग वगळता गावामध्ये जलसिंचनाची सुविधा **76.74%** लोकांकडे आहे तर **23.26%** लोकांकडे कोणत्याही प्रकारच्या जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध नाहीत.

**तक्ता क्रमांक – 17. दोंदे गावातील जलसिंचनाची स्थिती**

| अ. नं. | जलसिंचन उपलब्धता | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | **76.74** |
| 2 | नाही | **23.26** |

**आलेख क्रमांक - 17. दोंदे गावातील जलसिंचनाची स्थिती**





### 4.13 दोंदे गावातील जलसिंचन

खालील तक्त्यामध्ये शेतीसाठी उपलब्ध असलेल्या जलसिंचनाच्या सुविधांच्या प्रकारांचे विवरण करण्यात आलेले आहे. नदीकाठी गाव वसलेले असल्याने व गावातील बहुतांशी जमीन नदीच्या तीरावर असल्याने उपसा जलसिंचनाद्वारे जवळजवळ 68.84% लोक नदी जलसिंचनावर अवलंबून आहेत. विहिरींची संख्या ही उत्तम असल्याने 49.30% कुटुंबांकडे विहिरी आढळून आलेले आहेत याशिवाय इतर तलाव कालवा बोरवेल यादेखील सुविधा शेतीसाठी जलसिंचन म्हणून गावांमध्ये उपलब्ध असल्याचा दिसून आलेल्या आहेत.

**तक्ता क्रमांक – 18. दोंदे गावातील उपलब्ध जलसिंचन सुविधा प्रकार**

| अ. नं. | जलसिंचनाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | विहीर | **49.30** |
| 2 | तलाव | **9.77** |
| 3 | कालवा | **27.44** |
| 4 | बोरवेल | **6.05** |
| 5 | नदी | **68.84** |
| 6 | इतर | **0.93** |

**आलेख क्रमांक - 18. दोंदे गावातील उपलब्ध जलसिंचन**




### 4.13 दोंदे गावातील प्रमुख धान्य पिके (भरडधान्य)

दोंदे गावांमध्ये बारमाही बागायती शेती क्षेत्र उपलब्ध आहे तर काही प्रमाणात जिरायत्याची शेती देखील आहे.

**तक्ता क्रमांक – 19. दोंदे गावातील पिकरचना**

| अ. नं. | पिकाचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | ज्वारी | **55.35** |
| 2 | बाजरी | **77.21** |
| 3 | भुईमूग | **57.21** |
| 4 | गहू | **36.74** |
| 5 | मका | **41.40** |
| 6 | उडीद | **8.37** |
| 7 | तांदूळ | **13.49** |
| 8 | मूग | **57.67** |
| 9 | हरभरा | **17.21** |
| 10 | मटकी | **6.51** |
| 11 | सोयाबीन | **43.72** |
| 12 | इतर | **5.58** |

**आलेख क्रमांक - 19. दोंदे गावातील पिकरचना**




वास्तविक पाहता महाराष्ट्रामध्ये खरीप आणि रब्बी या दोन हंगामामध्ये वेगळ्या प्रकारची पिके घेतली जातात. परंतु जलसिंचनाच्या सुविधा उत्तम प्रकारच्या उपलब्ध असलेल्या गावांमध्ये वर्षभर वेगवेगळ्या प्रकारचे पिके घेतले जातात. अलीकडील काळामध्ये शेतीमधील खरिपाची आणि रब्बी हंगामाची पिके यांच्या पीक पद्धतीमध्ये

बराचसा बदल झाल्याचा आढळून येतो खालील सारणीमध्ये दोंदे गावांमध्ये घेतल्या जाणाऱ्या भरड धान्य पिकांची माहिती देण्यात आलेली आहे गावांमधील लोकांकडून ज्वारी, बाजरी, भुईमूग, गहू, मका, उडीद, तांदूळ, मूग, हरभरा, मटकी आणि सोयाबीन ही पिके घेतली जातात. यामध्ये अलीकडील काळात सोयाबीन हे पीक प्रामुख्याने अधिक प्रमाणात घेतले जात असल्याचे आढळून येते. खालील सारणी मध्ये प्रत्येक कुटुंबातील लोकांकडून घेतले जाणाऱ्या पिकांचा पीकनिहाय आढावा देण्यात आलेला आहे. यामध्ये बाजरी हे दररोजच्या खाद्यांना मधील पीक असल्याने बहुतांशी लोकांकडून बाजरीचे पीक घेतले जाते. मग काय हे पीक पशुपालनासाठी गरजेचे असल्याने मका देखील अधिक प्रमाणात लागवड केली जाते. खरिपाच्या हंगामात सोयाबीन या पिकाची लागवड अधिक प्रमाणात केली जाते.

### 5.8 दोंदे गावातील पीक रचना (बागायती पिके)


दोंदे गावांमध्ये जलसिंचनाच्या सुविधा उत्तम प्रकारच्या उपलब्ध असल्याने बारमाही शेती केली जाते यामुळे शेतीमध्ये भरड धान्य बरोबरच बागायताची पिके मोठ्या प्रमाणात केली जातात. बागायताच्या पिकांमध्ये भाजीपाल्यांची पिके करण्यावर ती लोकांचा अधिक प्रमाणात भर असल्याचे आढळून आले आहे. कांदा बटाटा मिरची टोमॅटो वांगी कारली काकडी कोबी फ्लॉवर मेथी कोथिंबीर ही पिके प्रामुख्याने शेतकऱ्यांकडून केली जातात. शेतीचे प्रमाण कमी असल्याने ऊस लागवडीचे प्रमाण तुलनेने कमी आढळून येते. कांदा आणि बटाटा ही दोन पिके प्रामुख्याने अधिक प्रमाणात लागवड केली जात असल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे राजगुरुनगर चाकण आणि पुणे ही मार्केट जवळ असल्याने शेतकऱ्यांकडून इतर भाजीपाला पिकांची देखील मोठ्या प्रमाणात लागवड केली जात असल्याचे आढळून आले आहे खालील सारणी मध्ये पीकनिहाय टक्केवारी देण्यात आलेले आहे.

**तक्ता क्रमांक – 20. दोंदे गावातील पिकरचना बागायती आणि भाजीपाल्याची पिके**

| अ. नं. | पिकाचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कांदा | **67.44** |
| 2 | रताळे | **12.09** |
| 3 | बटाटा | **37.67** |
| 4 | वांगी | **28.84** |
| 5 | उस | **18.60** |
| 6 | भेंडी | **30.23** |
| 7 | वेलवर्गीय | **6.98** |
| 8 | भेंडी | **28.84** |
| 9 | मिरची | **27.44** |
| 10 | टोमॅटो | **25.58** |
| 11 | कारली | **18.14** |

| | | |
|---|---|---|
| 12 | काकडी | **14.42** |
| 13 | कोबी | **14.88** |
| 14 | फ्लावर | **18.14** |
| 15 | मेथी | **27.44** |
| 16 | कोंथीबीर | **25.58** |
| 17 | इतर | **33.49** |

**आलेख क्रमांक - 20. दोंदे गावातील पिकरचना बागायती आणि भाजीपाल्याची पिके**




## 5.9 दोंदे गावातील अंदाजे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

**तक्ता क्रमांक – 21. दोंदे गावातील कुटुंबांचे अंदाजे एकुण वार्षिक उत्पन्न**

| अ. नं. | अंदाजे एकुण वार्षिक | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 10000 पेक्षा कमी | **25.12** |
| 2 | 10000 ते 20000 | **10.23** |
| 3 | 20000 ते 50000 | **41.86** |
| 4 | 50000ते 100000 | **18.14** |
| 5 | 100000 पेक्षा जास्त | **4.65** |

दोंदे हे गाव शेतीप्रधान असल्याने व शेतीचा आकार लहान असल्याने बहुसंख्य कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न हे अतिशय कमी असल्याचे आढळून आले आहे. दहा हजाराहून कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या लोकांची टक्केवारी **25.12%** इतके आहे वीस ते पन्नास हजार च्या दरम्यान वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांची टक्केवारी **41.86%** आहे तर एक लाख होऊन जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांचे प्रमाण केवळ **4.65** इतकेच आढळून आले आहे.

**आलेख क्रमांक - 21. दोंदे गावातील अंदाजे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न**





## 5.10 दोंदे गावातील आहार विहार

**तक्ता क्रमांक – 22. दोंदे गावातील आहाराची स्थिती**

| अ. नं. | आहाराचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | कुंटूबातील शाकाहारी लोकांची संख्या | **42.48** |
| 2 | कुंटूबातील मिश्रहारी लोकांची संख्या | **57.52** |

**आलेख क्रमांक - 22. दोंदे गावातील आहाराची स्थिती**





वास्तविक पाहता आपल्या परिसरामध्ये पिकवल्या जाणाऱ्या भाजीपाला आणि धान्य पिकांचा आपल्या आहारात समावेश होतो दोंदे हे गाव सांप्रदायिक गाव असल्याने शाकाहारी लोकांची संख्या 42.48% इतके आढळून येते तर मिश्रहारी लोकांची संख्या 57.52% इतकी असल्याचे आढळून येते. आहारामध्ये दुग्धजन्य पदार्थांबरोबर भाजी भाकरी, भात या प्रमुख घटक पदार्थाचा लोकांच्या अन्नांमध्ये समावेश होतो. तक्ता क्रमांक 23 मध्ये आहाराबाबतची सविस्तर माहिती देण्यात आलेले आहे.

**5.11 दोंदे गावातील आहार विहार (अन्नपदार्थ)**

**तक्ता क्रमांक – 23. दोंदे गावातील आहारातील पदार्थ**

| अ. नं. | पदार्थ | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | ज्वारीची भाकरी | **63.26** |
| 2 | बाजरीची भाकरी | **90.70** |
| 3 | तांदूळ | **87.44** |
| 4 | चपाती /पोळी | **70.23** |
| 5 | भाजी | **96.28** |
| 6 | दूध | **65.58** |
| 7 | मांस/मासे | **51.16** |
| 8 | अंडी | **43.26** |
| 9 | इतर | **22.33** |

**आलेख क्रमांक - 23. आहारातील पदार्थ**




वरील सारणी मध्ये दोंदे गावातील लोकांकडून जेवणामध्ये कोणकोणत्या अन्नपदार्थांचा समावेश केला जातो याबाबतची माहिती देण्यात आलेली आहे. प्रामुख्याने ज्वारीची आणि बाजरीची भाकरी हे अन्नपदार्थांचा प्रमुख घटक आहे. याबरोबरच भात चपाती भाजी दूध मासे अंडी इतर पदार्थ देखील दोंदे गावातील लोकांकडून अन्नपदार्थांमध्ये घेतले जातात. मांसाहार हा दैनिक स्वरूपात न केला जाता प्रासंगिक स्वरूपामध्ये केला जात असल्याचे दिसून येते. सैंदाणे ठाकरवाडी या ठिकाणी आढळणाऱ्या ठाकर समाजातील लोकांकडून मांसाहाराचे प्रमाण अधिक प्रमाणात केले जात असल्याचे आढळून येते तर गावामध्ये सांप्रदायिक लोकांची संख्या जास्त असल्याने बहुतांशी लोक शाकाहारी असल्याचे आढळून आले आहे.


### 5.12 दोंदे गावातील निवारा

खालील सारणी मध्ये दोंदे गावातील स्वतःच्या मालकी हक्काच्या घराबाबतची स्थिती दर्शवण्यात आलेली आहे. गावाकडे राहत असल्याने लोकांच्या हक्काचे घर प्रत्येकाकडे असल्याचे आढळून आले आहे गावातील जवळजवळ **97.21%** कुटुंबांचे स्वतःचे मालकी हक्काचे घर असल्याचे आढळून आले आहे. गावामध्ये कामानिमित्त बाहेरून आलेल्या लोकांचे प्रमाण अतिशय नग्न असल्याने त्याच लोकांकडे स्वतःच्या मालकी हक्काचे घर नाही असे आढळून आले आहे त्यांची संख्या केवळ **2.79** टक्के असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्रमांक – 24. दोंदे गावातील मालकी हक्काच्या घराबाबतची स्थिती**

| अ. नं. | घराबाबतची स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | **97.21** |
| 2 | नाही | **2.79** |

**आलेख क्रमांक - 24. मालकी हक्काच्या घराबाबतची स्थिती**





### 5.13 दोंदे गावातील निवासस्थाने (घरांची रचना) - भिंतींचे प्रकार

सर्वसाधारणपणे निवासस्थानाच्या बांधणीसाठी स्थानिक परिसरात मिळणाऱ्या वस्तूंचा वापर पूर्वीपासून लोक करत असल्याचे दिसून येते. परंतु अलीकडच्या काळामध्ये घरांच्या बांधकामासाठी साहित्य बदल झाल्याचा दिसून येतो. घरांचे बांधकाम करत असताना लोकांच्या आर्थिक स्थितीचा घरांच्या बांधकामावरती सर्वात मोठा प्रभाव झाल्याचा दिसून येतो. दोंदेगाव ही शेतीप्रधान असल्याने बहुतांशी लोकांची घरे ही बैठी घरे असून घरांच्या बांधकामासाठी स्थानिक प्रदेशात मिळणाऱ्या साहित्याबरोबर लोखंड व इतर साहित्याचा देखील वापर केल्यास आढळून येते. घरांच्या भिंतीसाठी प्रामुख्याने दगड माती कच्चा विटा भाजक्या विटा सिमेंट यांचा प्रभावीपणे वापर दोंदे गावांमध्ये होत असल्याचे आढळून येते. . अगदीच गवताची भिंती असलेले घरे ठाकरवाडी मध्ये **10.23%** आढळून येतात. उर्वरित वाड्यावर ती घरांच्या बांधकामासाठी डबर किंवा तोडी वापरण्याचे प्रमाण **18.60%** इतके आहे. कच्च्या विटांचा वापर **35.35%** लोकांकडून केला गेलेला आहे. तर पक्क्या विटांचा वापर **50.23%** लोकांकडून केलेला आहे. याबरोबरच सिमेंटचा वापर **50** टक्क्याहून अधिक लोकांनी केला असल्याचे दिसून येते. उर्वरित लोकांनी विटा आणि दगडाच्या बांधकामांमध्ये पांढरी माती किंवा स्थानिक प्रदेशात आढळणारी भुर्की माती मोठ्या प्रमाणात वापरल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 25. दोंदे गावातील घराच्या भिंतीच्या बांधकामासाठी उपयोगात आलेले घटक**

| अ. नं. | भिंतीसाठी उपयोगात आणलेले साहित्य | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | गवताचे | **10.23** |
| 2 | तोड | **18.60** |
| 3 | डबर | **32.56** |
| 4 | कच्च्या विटा | **35.35** |
| 5 | भाजक्या विटा | **50.23** |
| 6 | सिंमेट | **51.63** |

**आलेख क्रमांक - 25. दोंदे गावातील घराच्या भिंतीच्या बांधकामासाठी उपयोगात आलेले घटक**




## 5.14 दोंदे गावातील निवासस्थाने छप्पर बांधकाम


घरांच्या भिंतीच्या बांधकामा बरोबरच घराचे छप्पर देखील महत्त्वाचे असते. घराच्या छपराच्या बांधकामावर देखील लोकांचा आर्थिक व तिचा परिणाम झाल्याचे आढळून येते. अतिशय गरीब कुटुंब असलेल्या व्यक्तींकडून घराच्या छपरावरती प्लास्टिकचा कागद अथवा गवताचे आवरण टाकण्याकडे भर असतो. आदिवासी समाजातील काही लोकांकडून घराच्या छपरासाठी प्लास्टिकचा कागद वापरला जात असल्याचे आढळून आले आहे त्यांचे प्रमाण केवळ **2.19%** आढळून आले आहे. गावरान कवले किंवा विलायती कवले असणाऱ्या घरांचे प्रमाण **20%** च्या आसपास आहे सिमेंटचे स्लॅब साधारणपणे **16.74%** लोकांचे आहेत तर अलीकडील काळातील घराच्या छपरासाठी सर्वात जास्त उपयोग लोखंडी पात्रांचा केला गेल्याचे आढळून आले आहे. लोखंडी पत्रा हा स्वस्त आणि टिकाऊ असल्याने तसेच बांधकामांमध्ये सहज वापरता येत असल्याने दोंदे

गावातील लोकांकडून लोखंडी पत्रा सर्वात जास्त वापरला गेलेला आहे त्याचे प्रमाण जवळजवळ **65.12%** असल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 26. दोंदे गावातील घराच्या छप्पर बांधकामासाठी उपयोगात आलेले घटक**

| अ. नं. | छप्पर | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | प्लास्टिक कागद | **2.79** |
| 2 | गावरान कौले | **5.58** |
| 3 | गवत | **8.84** |
| 4 | विलायती कौले | **13.02** |
| 5 | सिमेंटचे स्लॅब | **16.74** |
| 6 | पत्र्याचे | **65.12** |

**आलेख क्रमांक - 26. दोंदे गावातील घराच्या छप्पर बांधकामासाठी उपयोगात आलेले घटक**




## 4.14 दोंदे गावातील घरांचा आकार


दोंदे गावातील बहुतांशी घरे ही बैठ्या स्वरूपाचे आहेत. जमिनीची पुष्कळशी उपलब्धता असल्याने, तसेच घराच्या आसपास गुरांसाठी गोठा बांधकाम करावा लागत असल्याने बहुतांशी लोकांची घरे ही बैठे आहेत. बैठ्या स्वरूपांची घरे असण्याचा फायदा म्हणजे आपणास खालीवर चढ-उतार करावी लागत नाही शेतकरी कुटुंबांमध्ये शेतीचे साहित्य अधिक प्रमाणात असल्याने ते ठेवण्यासाठी बैठ्या स्वरूपाच्या घरांचा वापर प्रभावीपणे करता येतो.त्यामुळे दोंदे गावांमध्ये बहुतांशी घरे बैठ्या स्वरूपाचे आहेत. घरामध्ये असलेल्या खोल्यांच्या प्रमाणावरून घराचा आकार समजण्यास मदत होते. सर्व साधारणपणे अतिशय लहान घरे असलेल्या लोकांचे प्रमाण 7.44% इतके आहे दोन ते तीन खोल्या असणाऱ्या घरांचे प्रमाण 55.35% इतके आहे चार ते

पाच खोल्या असणाऱ्या घरांचे प्रमाण 32.56% इतके आहे तर सहावून जास्त खोल्या असणाऱ्या घरांचे प्रमाण 4.65% इतके आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 27. दोंदे गावातील घरनिहाय खोल्यांची एकूण संख्या**

| अ. नं. | खोल्यांची एकूण संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | 0 -1 | **7.44** |
| 2 | 2 -3 | **55.35** |
| 3 | 4 – 5 | **32.56** |
| 4 | 6 + | **4.65** |

**आलेख क्रमांक - 27. दोंदे गावातील घरनिहाय खोल्यांची एकूण संख्या**





**5.16 दोंदे गावातील इंधन प्रकार**

खालील सारणी मध्ये दोंदे गावातील कुटुंबांमध्ये विजेचे प्रमाण असलेल्या घरांची संख्या दर्शवण्यात आलेली आहे. मानवी विकास निर्देशांक मधील घरामध्ये वीज असणे हे एक महत्त्वाचा निर्देशांक समजले जाते. दोंदे हे गाव वीज वापरामध्ये पुष्कळ पुढे असल्याचे दिसून येते. गावातील एखाद दुसरे कुटुंब वगळल्यास जवळजवळ गावातील प्रत्येक घरामध्ये वीज उपलब्ध असल्याचे आढळून आलेले आहे. गावातील वीज वापर करणाऱ्या घरांचे प्रमाण 97.21% इतके आहे तर वीज नसणाऱ्या घरांचे प्रमाण केवळ 2.79 टक्के इतके आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 28. दोंदे गावातील घरनिहाय विजेबाबतची स्थिती**

| अ. नं. | अंदाजे एकुण वार्षिक | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | **97.21** |
| 2 | नाही | **2.79** |

**आलेख क्रमांक - 28. दोंदे गावातील घरनिहाय विजेबाबतची स्थिती**





### 4.14 दोंदे गावातील गोठ्याबाबतची स्थिती

दोंदे हे गाव शेतीप्रधान गाव असल्याने तसेच राजगुरुनगर चाकण पुणे ही शहरे जवळ असल्याने शेतीबरोबर इतर पूरक व्यवसाय मोठ्या प्रमाणात केले जातात. शेतीसाठी पूरक व्यवसाय म्हणून जवळजवळ अनेक घरांमध्ये पशुपालन हा व्यवसाय केला जातो. गाई म्हशी शेती कामासाठी बैल शेळ्या मेंढ्या यांचे पालन गावातील अनेक कुटुंबाकडून केले जाते त्यामुळे पशुपालनासाठी गोठा हा अत्यावश्यक मानला जातो वाड्यावर असताना वरती राहणाऱ्या जवळजवळ प्रत्येक कुटुंबाकडे गोठा आढळून आलेला आहे. प्रत्यक्ष गावठाणात राहणाऱ्या लोकांकडे मात्र गोठ्याचा अभाव आढळून येतो त्यामुळे दोंदे गावांमध्ये **55.35%** लोकांकडे पशुपालनासाठी गोठा उपलब्ध आहे.

**तक्ता क्रमांक – 29. दोंदे गावातील घरनिहाय गोठयाबाबतची स्थिती**

| अ. नं. | गोठयाबाबतची स्थिती | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | **55.35** |
| 2 | नाही | **44.65** |

आलेख क्रमांक - 29. गोठयाबाबतची स्थिती





**4.14 दोंदे गावातील उपलब्ध पशुधन**

खालील सारणी मध्ये दोंदे गावात उपलब्ध असलेले पशुधन दर्शवण्यात आलेले आहे. हे पशुधन दर्शवता असताना कुटुंबातील किती लोकांकडे साधारण पशुधन उपलब्ध आहे त्यानुसार टक्केवारी काढण्यात आलेले आहे. सर्वे करण्यात आलेल्या एकूण कुटुंबांपैकी **18.66%** कुटुंबांकडे गाई आहेत **5.98%** कुटुंबांकडे बैल आहेत अलीकडील काळात शेती कामासाठी बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतले असल्याने बैलांची संख्या झपाट्याने कमी झाल्याचे आढळून आलेले आहे. दोंदे गावांमध्ये साधारण ठाकरवाडी व इतर वस्त्यांवरती शेळ्या मेंढ्यांची संख्या ही लक्षणीय आढळून आलेले आहे याशिवाय वस्त्यांवर आढळणाऱ्या लोकांकडे कोंबड्यांची संख्या देखील आढळून आलेली आहे. दुग्ध उत्पादनासाठी गाई आणि म्हशींचा वापर केला जात असल्याने त्यांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 30. दोंदे गावातील पशुधन**

| अ. नं. | पाळीव प्राण्यांचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | गाय | **18.66** |
| 2 | बैल | **5.98** |
| 3 | शेळी | **15.70** |
| 4 | मेंढी | **1.67** |
| 5 | कोंबडया | **53.22** |
| 6 | म्हैस | **3.54** |
| 7 | इतर | **1.22** |

आलेख क्रमांक - 30. दोंदे गावातील पशुधन




*****************

# प्रकरण सहावे

# सांस्कृतिक घटक

सांस्कृतिक घटक हा एक व्यापक विषय आहे. यात मानवनिर्मित सर्वच घटकांचा समावेश होतो. शेती, व्यापार, उद्योग, अर्थ, व्यवसाय, वसाहती, खेडी, शहरे, कारखाने, दळणवळण, भाषा, धर्म, रूढी, चालीरीती, परंपरा, जाती प्रथा, केशभूषा, वेशभूषा अशा शेकडो गोष्टींचा समावेश सांस्कृतिक घटकात होतो.

**6.1 सण समारंभ-**

महाराष्ट्रात जे सण साजरे होतात ते सर्व दोंदे या गावातील साजरी केले जातात. चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढीपाडवा हा सण साजरा केला जातो. चैत्र शुद्ध नवमीला राम जन्मोत्सव साजरा करतात ह्याच दिवशी गावात श्रीराम व काळभैरवनाथ या देवतांची यात्रा दोन दिवस मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. वैशाख शुद्ध तृतीय अक्षय तृतीया साजरी करतात. ज्येष्ठ पौर्णिमेस स्त्रिया वटसावित्रीची पूजा करतात. आषाढ शुद्ध एकादशीला येथील लोक उपवास करतात. श्रावण पंचमीस नागपंचमी साजरी करतात. श्रावण पौर्णिमेस बहिणी भावास राख्या बांधतात. श्रावण कृष्ण अष्टमीस  कृष्णजन्मोत्सव साजरा करतात. याच कालावधीत दोंदे गावात सात दिवस अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. भाद्रपद शुद्ध चतुर्थी पासून चतुर्दशी पर्यंत गावात सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो. भाद्रपद अमावस्या बैलपोळा हा सण करतात आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवमीपर्यंत सार्वजनिक नवरात्र महोत्सव मोठ्या आनंदात साजरा केला जातो. दशमीला विजयादशमी किंवा दसरा साजरा केला जातो. आश्विन वैद्य द्वादशी पासून कार्तिक द्वितीय पर्यंत दीपावली हा सण साजरा केला जातो. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी चंपाषष्ठी म्हणून साजरी करतात. पौष महिन्यातील जानेवारी 14 किंवा 15 तारखेस मकर संक्रांत साजरी करतात. फाल्गुन महिन्याला शिमग्याचा महिना म्हणतात फाल्गुन पौर्णिमेस होळी आणि वैद्य प्रतिपदेस धुळवड किंवा धुलीवंदन साजरी करतात. रंगपंचमीपर्यंत रंगाची उधळण केली जाते. दोंदे गावातील विवाह प्रथेनुसार विवाहाच्या दिवशी सकाळी साखरपुडा दुपारी हळद लावणे संध्याकाळच्या गोरज मुहूर्तावरती शुभविवाह संपन्न केला जातो. प्रत्येक घरी विवाह कार्यानंतर खंडोबाचे जागरण आणि देवीचा गोंधळ हे कार्यक्रम खंडोबाच्या मंदिरात किंवा घरापुढे अंगणात करतात. अशा विविध सणसमारंभाने वर्षभर दोंदे गावांमध्ये आयोजन नियोजन करून संपन्न केले जातात.

सांस्कृतिक घटक हा हा एक व्यापक विषय आहे. यात मानव निर्मित सर्वच घटकांचा समावेश होतो. शेती व्यापार, उद्योग अर्थ, व्यवसाय, वसाहती, खेडी, शहरे, कारखाने, दळणवळण, भाषा, धर्म, रूढी,

चालीरीती, परंपरा, जातिप्रथा, केशभूषा, वेषभूषा अशा शेकडो गोष्टींचा समावेश सांस्कृतिक घटकात होतो. यातील काही घटकांचा आपण इतरत्र अभ्यास केलेला असल्याने येथे उरलेल्या फक्त काही घटकांचा अभ्यास करावयाचा आहे.

महाराष्ट्रात जे सण साजरे होतात ते सर्व दोंदे या गावातही साजरे केले जातात. चैत्र शुद्ध प्रतिपदेला गुढी पाडवा हा सण साजरा केला जातो. चैत्र शुद्ध नवमीला राम जन्मोत्सव साजरा करतात. वैशाख शुद्ध तृतियेस अक्षय तृतिया साजरी करतात. ज्येष्ठ पौर्णिमेस स्त्रिया वटसावित्रीची पूजा करतात. आषाढ शुद्ध एकादशीस येथील लोक उपवास करतात. श्रावण पंचमीस नाग पंचमी साजरी करतात. श्रावण पौर्णिमेस बहिणी भावास राख्या बांधतात. श्रावण कृष्ण अष्टमीस कृष्ण जन्मोत्सव करतात. भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून चतुर्दशी पर्यंत गावात गणेशोत्सव साजरा केला जातो. भाद्रपद आमावस्येस बैलपोळा हा सण करतात.अश्विन शु. प्रतिपदेपासून नवमी पर्यंत नवरात्रोत्सव करतात. दशमीला विजया दशमी किंवा दसरा साजरा केला जातो. आश्विन वद्य द्वादशी पासून कार्तिक शु. द्वितियेपर्यंत दिपावली हा सण साजरा केला जातो. कार्तिक शु. द्वादशी पासून पौर्णिमेपर्यंत तुळशीचे लग्न लावतात.  मार्गशीर्ष शु. षष्ठी चंपाषष्ठी म्हणून साजरी करतात. पौष महिन्यातील जानेवारी 14 किंवा 15 तारखेस मकर संक्रात साजरी करतात. फाल्गुन महिण्याला शिमग्याचा महिना म्हणतात. फाल्गुन पौर्णिमेस होळी आणि वद्य प्रतिपदेस धुलवड किंवा धुलीवंदन करतात. रंगपंचमीपर्यंत रंगांची उधळण केली जाते.

### 6.2 चालीरीती -

प्रत्येक घरी मुलाचे लग्न झाल्यानंतर खंडोबाचे जागरण आणि देवीचा गोंधळ हे कार्यक्रम करतात. हे जागरण गोंधळ खंडोबाच्या मंदिरात किंवा घरापुढे करतात. तसेच हिंदू धर्मीयांची संख्या अधिक असल्याने हिंदू धर्म परंपरेप्रमाणे जे सण समारंभ साजरे केले जातात. ते सर्व सणसमारंभ दोंदे गावात साजरे केले जातात. हिंदू धर्म परंपरेप्रमाणे सोळा संस्कार व त्यासंबधी सर्व व्रत वैकल्यांचेही पालन केले जाते.

### 6.3 गावची यात्रा -

माघ पौर्णिमा आणि चैत्र पौर्णिमेस खंडोबा देवाची यात्रा असते. दोन्ही यात्रा मोठ्या प्रमाणात भरतात आणि या यात्रांस शेजारील गावातील लोक मोठ्या प्रमाणत येतात.

### 6.4 विवाह पद्धती -

महाराष्ट्रातील विवाहाप्रमाणेच दोंदेगावातही विवाह संपन्न होतात. विवाहाच्या अगोदर आपल्या जातीतीलच सोयरीक शोधली जाते. त्यांनतर विवाह जमविताना हुंडा आणि विवाह वधूपक्षाने की वरपक्षाने

करावयाचा हे ठरविले जाते. हे ठरल्यानंतर गंधाचा कार्यक्रम होता. विवाहाची तारीख ठरवितात. विवाहाच्या दिवशी दुपारी 12.00 वा. साखरपुडा करतात. नंतर हळद लावली जाते. सायंकाळी मंगलाष्टकांच्या गजरात विवाह संपन्न होतो. नंतर सप्तपदी वगैरे उरकून विवाह संपतो.

**6.5 वेशभूषा -**

दोंदे गावामध्ये पारंपारिक आणि आधुनिक अशी दोन्ही प्रकारची वेशभूषा असलेली आढळून येते. सहावारी साडीबरोबरच नववारी साडी नेसणा-या स्त्रियाही आढळून येतात. तसेच पॅंट शर्ट बरोबर सदरा आणि धोतर नेसणारेही दिसून येतात. पण आता अलीकडे केवळ वयोवृद्ध माणसेच धोतर आणि फेटे घालताना दिसून येत आहेत. काही दिवसानंतर हे नामशेष होईल. फेटे तर नामशेष होण्याच्या मार्गावरच आहेत. दोंदे गावामध्ये वेशभूषेच्या बाबतीत पुढील परिस्थिती आढळून आली.

**दोंदे गावातील पोशाख पद्धती**


**तक्ता क्रमांक – 31. दोंदे गावातील पोशाख पध्दती**

| अ. नं. | पोशाखाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | नउवारी साडी | **53.95** |
| 2 | सहावारी साडी | **80.00** |
| 3 | पायजमा शर्ट | **40.47** |
| 4 | सदरा/धोतर | **25.58** |
| 5 | पॅंट/शर्ट | **78.60** |
| 6 | सलवार कुर्ता | **33.02** |
| 7 | इतर | **13.95** |

सांस्कृतिक लक्षणांमध्ये आहार विहारा बरोबरच पोशाख पद्धतीला देखील अत्यंत महत्त्व आहे दोन ते हे गाव महाराष्ट्रातील पठारावरील एक प्रमुख गाव आहे. महाराष्ट्रातील पोषक पद्धतीचा परिणाम या गावातील लोकांच्या पोशाख पद्धतीवर झाल्याचा आढळून येतो. शहरालगत हे गाव असल्याने काही प्रमाणात शहरी संस्कृतीचा देखील पोशाख पद्धतीवर परिणाम झाल्याचा दिसून येतो. सर्वसाधारणपणे. वयस्कर लोकांकडून त्यातल्या त्यात महिलांकडून नऊवारी साडी तसेच सहावारी साडी हा पोशाख परिधान केला जातो यामध्ये सहावारी साडी घालणाऱ्या महिलांचे प्रमाण जवळ 80 टक्के येऊन जास्त आहे नऊवारी साड्या घालणाऱ्या महिलांचे प्रमाण 53.95% इतके आहे पुरुषांमध्ये प्रामुख्याने वयस्कर पुरुषांकडून पायजामा शर्ट साजरा धोतर हा पोशाख प्रदान केला जातो तर अलीकडील काळात तरुण मुला-मुलींकडून जे पोषक परिधान केले जातात ते अनुक्रमे पॅन्ट शर्ट आणि सलवार-कमीज असे आहेत. महिलांच्या पोशाखांवरती प्रामुख्याने लग्न झाल्यानंतर

परिधान केले जाणारे पोशाख आणि लग्ना अगोदर परिधान केले जाणारे पोशाख यामध्ये काही प्रमाणात बदल झाल्याचा दिसून येतो. ज्या मुली लग्ना अगोदर सलवार कुर्ता अथवा पॅन्ट शर्ट असे पोषक परिधान करतात त्या लग्न झाल्यानंतर जवळजवळ 80 टक्के महिलांकडून सहावारी साडी हा पोशाख अलीकडच्या काळामध्ये परिधान केला गेल्याचा दिसून येतो. पोशाख पद्धतीमध्ये साधारणपणे वापरण्यास सूटेबल किंवा सोयीस्कर असलेले पोशाख घालण्याकडे अलीकडील पिढीचा कल असल्याचा दिसून येतो. शहरापासून दोंदे गावाचे लोकेशन स्थान जवळ असल्याने यावर शहरी संस्कृतीचा ही मोठा प्रभाव झाल्याचा आढळून येतो.

**आलेख क्रमांक - 31. दोंदे गावातील पोशाख पध्दती**




*****************

# प्रकरण सातवे

# विविध सुविधा


## 7.1 दोंदे गावातील सुविधा स्नानगृहे

मानवी विकास निर्देशांकाचे मापन करत असताना अनेक घटकांबरोबर घरामध्ये उपलब्ध असलेले स्नानगृह देखील महत्त्वाचे मानले जाते दोंदे गावांमध्ये घरामध्ये उपलब्ध असलेले स्नानगृह घराच्या बाहेर उपलब्ध असलेले स्नानगृह आणि घरामध्ये स्नानगृहच उपलब्ध नाही अशा प्रकारे आकडेवारीचे विश्लेषण करण्यात आले ते खालील सारणी मध्ये दर्शनात आलेले आहे. खालील सारणीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की दोंदे गावांमध्ये प्रत्यक्ष घरामध्येच स्नानगृह उपलब्ध आहे अशा घरांची संख्या जवळजवळ **55.35%** इतकी आढळून आलेले आहे तर घराच्या बाहेर स्नानगृह उपलब्ध आहे किंवा स्नानगृह उपलब्ध नाही अशा लोकांचे प्रमाण **44.65%** इतके आढळून आलेले आहे.

**तक्ता क्रमांक – 32. दोंदे गावातील स्नानगृहाबाबतीची स्थिती**

| अ. नं. | स्नानगृहाची उपलब्धता | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | **55.35** |
| 2 | नाही | **44.65** |

**आलेख क्रमांक - 32. दोंदे गावातील स्नानगृहाबाबतीची स्थिती**




## 7.2 दोंदे गावातील सुविधा स्वच्छतागृह

शासनाकडून भारतभर हागणदारी मुक्त गाव ही संकल्पना राबविण्यात आली. दोंदे गाव हे देखील यामध्ये अग्रेसर असल्याचे आढळून आले आहे. दोन ते गाव हे निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त गाव आहे या गावाने अनेक पुरस्कार प्राप्त केलेले आहेत त्यामुळे गाव हे शंभर टक्के हागणदारीमुक्त गाव झालेले आहे गावामध्ये स्वतःचे स्वच्छतागृह असण्याबरोबरच इतर सार्वजनिक स्वच्छतागृहांचा प्रभावीपणे वापर केला जात असल्याचे आढळून आले आहे. गावातील जवळजवळ **95.35%** लोकांचे स्वतःच्या मालकीचे स्वच्छतागृह म्हणजेच शौचालय उपलब्ध आहे तर गावातील **4.65%** लोकांकडे जरी स्वतःचे शौचालय उपलब्ध नसले तरी गावातील सार्वजनिक शौचालयांचा ते प्रभावीपणे वापर करत असल्याचे आढळून आले आहे त्यामुळे गावाला **100%** हागणदारी मुक्तीचा किताब मिळालेला आहे.

**तक्ता क्रमांक – 33. दोंदे गावातील स्वच्छतागृहाबाबतीची स्थिती**

| अ. नं. | स्वच्छतागृहाची उपलब्धता | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | होय | **95.35** |
| 2 | नाही | **4.65** |

**आलेख क्रमांक - 33. दोंदे गावातील स्वच्छतागृहाबाबतीची स्थिती**




## 7.3 दोंदे गावातील सुविधा पिण्यासाठी पाणीपुरवठा


मानवी विकास निर्देशांकामधील अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गरजांचा समावेश होतो यामध्ये पिण्याचे शुद्ध पाणी हा निर्देशांक अतिशय महत्त्वाचा मानला जातो. दोंदे हे गाव भीमा नदीच्या तीरावर वसलेले असल्याने तसेच भीमा नदीवर कोल्हापूर टाईप बंधारा बांधला असल्याने तसेच चासकमान धरणाच्या कालव्याचा हा परिसर असल्याने या गावांमध्ये पिण्यासाठी पुष्कळ पाणी उपलब्ध आहे. सार्वजनिक नळ पुरवठा योजनेद्वारे गावातील

लोकांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो यासाठी नदीच्या काठावर विहिरीचे खोदकाम करून तेथे पाणी शुद्धीकरणाचा प्रकल्प राबवण्यात आलेला आहे आणि या प्रकल्पाद्वारे गावातील वाड्यावर त्यांवर शुद्ध पाण्याचे जाळे विणलेले आहे त्यामुळे गावातील प्रत्येक व्यक्तीला कुटुंबामध्ये पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध असल्याचे आढळून येते. काही प्रमाणात वाड्यावर स्तन व राहणार लोकांकडून मात्र आपल्या स्वतःच्या मालकीच्या विहिरीचा अथवा बोरवेल चा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी केला जातो. पिण्याच्या पाण्याबरोबर घरगुती वापराचे पाने तसेच जनावरांसाठी पिण्यासाठी आवश्यक असलेले पाणी या लोकांकडून विहीर बोरवेल कालवा नदी याद्वारे वापरले जाते. . गावठाणा मध्ये राहणाऱ्या लोकांना नळ पाणीपुरवठा द्वारे पिण्याच्या पाण्याचा व वापराच्या पाण्याचा पुरवठा केला जातो जवळ जवळ **61.40%** लोकांना नळ पाणीपुरवठ्याद्वारे पाणीपुरवले जाते उर्वरित **51.63%** लोक विहिरी वरती अवलंबून आहेत त्याचबरोबर नदीच्या काठी राहणारे लोक वापरासाठी नदीच्या पाण्याचा वापर करतात ही यांचे प्रमाण जवळ **47.44%** इतके आहे. तसेच कोपनलिका किंवा बोरवेल चा वापर **2.33%** लोकांकडून केला जातो गावच्या दक्षिणेला उंचावतेचा कुशीमध्ये उपलब्ध असलेल्या तलावाचा वापर काही लोकांकडून केला जातो यांचे प्रमाण मात्र अत्यल्प म्हणजे **1.86%** इतके आहे.

**तक्ता क्रमांक – 34. दोंदे गावातील पिण्यासाठी पाणीपुरवठयाची सोय स्त्रोत**

| अ. नं. | पाणीपुरवठयाचा स्त्रोत | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | विहीर | **51.63** |
| 2 | नळ | **61.40** |
| 3 | नदी | **47.44** |
| 4 | कुपनलिका/बोरवेल | **2.33** |
| 5 | तलाव | **1.86** |

**आलेख क्रमांक - 34. पाणीपुरवठयाची सोय**




## 7.4 दोंदे गावातील सुविधा स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे इंधन

घरगुती वापरासाठी किंवा स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे इंधन हा देखील अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे दोन दे गावामध्ये स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे इंधन हे प्रामुख्याने एलपीजी गॅस असल्याचे दिसून येते. गावातील कुटुंबातील अनेक कुटुंबाकडे एलपीजी गॅस उपलब्ध आहे. एलपीजी गॅस बरोबरच पारंपारिक इंधनाचा देखील काही प्रमाणात लोकांकडून वापर केला जातो हा वापर प्रामुख्याने वाड्यावर असताना वरील लोक करताना दिसून येतात. वाड्यावर त्यांवरील लोकांकडून लाकूड गौऱ्या यांचा वापर काही प्रमाणात इंधनासाठी केला जातो ते खालील सारणी मध्ये दर्शवण्यात आलेले आहे. साधारणपणे **46.51%** लोकांकडून स्वयंपाकासाठी इंधन म्हणून लाकडाचा वापर केला जातो **40.47%** लोकांकडून गौर यांचा वापर केला जातो. **72.56%** लोकांकडून इंधनासाठी मात्र एलपीजी गॅसचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो काही लोकांकडून विद्युत उपकरणे देखील वापरले जातात तर **2.33%** लोकांकडे स्वतःच्या मालकीचा गोबर गॅस प्लांट उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे.

**तक्ता क्रमांक – 35. दोंदे गावातील स्वंयपाकासाठी वापरण्यात येणा-या इंधनाचा प्रकार**

| अ. नं. | इंधनाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | लाकूड | **46.51** |
| 2 | गोव-या | **40.47** |
| 3 | गोबर गॅस | **2.33** |
| 4 | एलपीजी गॅस | **72.56** |
| 5 | रॉकेल | **4.65** |
| 6 | विद्युत उपकरणे | **6.51** |
| 7 | इतर | **3.26** |

**आलेख क्रमांक - 35. स्वंयपाकासाठी वापरण्यात येणा-या इंधनाचा प्रकार**




### 7.5 दोंदे गावातील सुविधा घरामध्ये उपलब्ध असलेली वाहतुकीची साधने

खालील सारणी मध्ये दोंदे गावातील घरामध्ये उपलब्ध असलेली वाहतुकीचे साधने याबाबत माहिती देण्यात आलेली आहे. दोन ते गावांमध्ये वाहतुकीसाठी सर्वात जास्त दुचाकी आणि सायकल यांचा वापर केला जातो कार ट्रक किंवा इतर वाहतुकीच्या साधनांचा वापर तुलने कमी प्रमाणात केला जातो. दोन ते गाव हे रस्त्याच्या कडेला तसेच राजगुरुनगर शहरापासून नजीक असल्याने आणि सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधा उत्तम प्रकारच्या उपलब्ध असल्याने त्यांचा देखील मोठ्या प्रमाणात वापर केला जात असतो त्यामुळे स्वतःच्या मालकीच्याच वाहतुकीच्या साधनांवर या लोकांना अवलंबून राहावे लागत नाही तरी वाड्यावर त्यांवर राहणारे लोक सायकल आणि दुचाकी यांचा मोठ्या प्रमाणात वाहतुकीसाठी वापर करतात.

**तक्ता क्रमांक – 36. दोंदे गावातील घरनिहाय उपलब्ध वाहतूकीची साधने**

| अ. नं. | वाहतूकीच्या साधनांचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | सायकल | **55.35** |
| 2 | दुचाकी | **27.44** |
| 3 | कार | **2.33** |
| 4 | ट्रक | **4.19** |
| 5 | टेम्पो | **6.98** |
| 6 | ट्रॅक्टर | **9.77** |
| 7 | जेसीबी | **0.00** |
| 8 | बैलगाडी | **7.44** |

**आलेख क्रमांक - 36. घरनिहाय उपलब्ध वाहतूकीची साधने**



### 7.6 दोंदे गावातील सुविधा मनोरंजनाची साधने

खालील सारणी मध्ये दोंदे गावात प्रत्येक घरामध्ये उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या मनोरंजनाच्या साधनांचे विवरण करण्यात आलेले आहे. मनोरंजनासाठी म्हणून वेगवेगळया प्रकारच्या साधनांचा वापर केला जातो अलीकडच्या काळात दूरदर्शन केबल टीव्ही मोबाईल या साधनांचा मनोरंजनाच्या साधनांमध्ये अधिक प्रमाणामध्ये वापर वाढलेला आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीकडे मोबाईल असल्याचे आढळून येते जवळजवळ **91.63%** कुटुंबामध्ये लोकांकडे मोबाईल आढळून आलेला आहे तसेच **90%** च्या आसपास कुटुंबाकडे टीव्ही उपलब्ध आहे. याशिवाय इतर मनोरंजनाच्या साधनांचा वापर देखील दोन ते गावातील लोकांकडून केला जात असल्याचे आढळून येते.

**तक्ता क्रमांक – 37. दोंदे गावातील घरनिहाय मनोरंजनासाठी उपलब्ध साधने**

| अ. नं. | मनोरंजनाची साधने | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | सीडी प्लेअर | **13.95** |
| 2 | वीणा | **4.65** |
| 3 | मोबाईल | **91.63** |
| 4 | टी व्ही | **88.37** |
| 5 | केबल | **27.91** |
| 6 | डिष | **8.37** |
| 7 | रेडियो | **10.23** |
| 8 | कॉम्प्यूटर | **7.44** |
| 9 | प्रिंटर | **0.47** |
| 10 | स्कॅनर | **1.40** |
| 11 | लॅपटॉप | **8.37** |
| 12 | टेबलेट | **2.33** |

### 7.7 दोंदे गावातील सुविधा घरगुती उपकरणे

अलीकडील काळात विविध प्रकारची इलेक्ट्रॉनिक तसेच सोयी सुविधायुक्त घरगुती उपकरणे वापरण्याकडे लोकांचा कल अधिक वाढलेला आहे दोन्ही गाव हे शहरी भागापासून जवळ असल्याने गावांमधील लोकांकडून विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक तसेच सोयी सुविधांसाठी आवश्यक असणाऱ्या साधनांचा वापर प्रभावीपणे केला जात असल्याचे दिसून येते. या सर्व घरगुती उपकरणांची माहिती खालील सारणी मध्ये दिलेले आहे. यापैकी इस्त्री गॅस खुर्च्या टेबलकपाटे यांचे प्रमाण जवळ प्रत्येक कुटुंबाकडे आहे

**तक्ता क्रमांक – 38. दोंदे गावातील घरनिहाय उपलब्ध इतर घरगुती उपकरणे**

| अ. नं. | घरगुती उपकरणाचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | इस्त्री | **84.19** |
| 2 | हिटर | **40.93** |
| 3 | गॅस | **72.56** |
| 4 | कपाटे | **69.30** |

| | | |
|---|---|---|
| 5 | खुर्च्या | **76.28** |
| 6 | टेबल | **55.35** |
| 7 | सोफासेट | **44.65** |
| 8 | दिवाण | **46.51** |
| 9 | शोकेस | **33.95** |
| 10 | कणीग | **5.58** |

### 7.8 दोंदे गावातील सुविधा इतर उपकरणे

खालील सारणी मध्ये दोंदे गावांमध्ये उपलब्ध असलेल्या घरणी आहे इतर सुविधात्मक उपकरणांची माहिती देण्यात आलेली आहे. दैनिक वापरामध्ये प्रत्येक घरामध्ये वेगवेगळ्या साधनांचा वापर केला जातो या सर्व साधनांमध्ये जसे खाट धुलाई यंत्र सेवन यंत्र इंजिन मोटार नांगर मळणी यंत्र अशा अनेक विविध घटकांचा समावेश होतो या घटकांच्या संदर्भात खालील सारणी मध्ये माहिती देण्यात आलेले आहे तसेच आलेखाद्वारे देखील त्या संदर्भात माहिती दर्शवण्यात आलेले आहे.

**तक्ता क्रमांक – 39. दोंदे गावातील घरनिहाय उपलब्ध इतर उपकरणे व साहित्य**

| अ. नं. | इतर उपकरणे | टक्केवारी | अ. नं. | इतर उपकरणे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | खाट | **78.60** | 11 | तिफन | **6.05** |
| 2 | बाज | **70.70** | 12 | पाभर | **6.98** |
| 3 | धुलाईयंत्र | **12.56** | 13 | मळणीयंत्र | **8.84** |
| 4 | षिवणयंत्र | **17.67** | 14 | क्रेन | **1.86** |
| 5 | इंजिन | **9.77** | 15 | रोटर | **6.98** |
| 6 | मोटर | **22.79** | 16 | काकर | **2.79** |
| 7 | नांगर | **21.40** | 17 | सारंगी | **2.33** |
| 8 | औत | **16.74** | 18 | टाकी | **19.53** |
| 9 | ग्रंथ | **15.35** | 19 | मृदंग | **0.93** |
| 10 | पेटी | **10.70** | 20 | कॅमेरा | **3.26** |

*****************

**निष्कर्ष**

१. दोंदे गावाच्या दक्षिणेस डोंगराळ प्रदेश असून त्याचा उतार उत्तरेकडे आहे.

२. दोंदे गावाच्या उत्तर हद्दीतून भीमा नदी वाहत असून तिला दक्षिणेकडून वाहत आलेले पाण्याचे प्रवाह गावठाणा जवळ येऊन मिळतात.

३. दोंदे गावची दक्षिणेकडील मृदा मुरबाड असून उत्तरेकडील नदीकाठची मृदा काळी कसदार आहे.

४. दोंदे गावचे हवामान मोसमी असून येथे सरासरी 67 सेंटीमीटर पाऊस पडतो.

५. दोंदेगाव परिसरात उष्ण कटिबंधीय पानझडी वृक्ष आढळतात.

६. दोंदेगाव परिसरात विविध प्रकारचे पशुपक्षी आढळतात.

७. दोंदे गावांमध्ये हिंदू धर्माच्या लोकांची संख्या खूपच असून इस्लाम व बौद्ध लोकांची संख्या कमी आहे.

८. दोंदे गावच्या एकूण लोकसंख्येमध्ये 47.77 टक्के स्त्रिया तर 52.23% पुरुषांचे प्रमाण पाहावयास मिळते.

९. दोंदे गावांमध्ये कार्यप्रवण लोकसंख्या 68.81% असून 31.19% अवलंबित लोकसंख्या प्रमाण पाहावयास मिळते.

१०. दोंदे गावांमध्ये विवाहिता लोकांपेक्षा अविवाहित लोकांची संख्या अधिक आहे.

११. दोंदे गावामध्ये साक्षर लोकांची संख्या निरक्षर लोकांपेक्षा जास्त असली तरी पदवीधर लोकांचे प्रमाण फारच कमी आहे.

१२. दोंदे गावांमधून फारच कमी लोकांनी इतरत्र स्थलांतर केलेले आहे.

१३. दोंदे गावांमध्ये सर्वात जास्त म्हणजे 42.12% लोक शेती करतात.

१४. दोंदे गावांमध्ये अनुक्रमे बाजरी, ज्वारी, गहू ही अन्नधान्याची पिके तर विविध प्रकारच्या भाजीपाल्याच्या पिकांचेही उत्पादन घेतले जाते.

१५. दोंदे गावांमध्ये सर्वात जास्त जलसिंचन अनुक्रमे नदी, विहीर, कालवा यांच्या माध्यमातून होते.

१६. दोंदे गावामध्ये २०००० ते ५०००० रुपये या वार्षिक उत्पन्न गटात सर्वात अधिक लोक आहेत.

१७. दोंदे गावामध्ये ७६.७४% क्षेत्रास जलसिंचन सुविधा उपलब्ध आहे तर उर्वरित शेत जमीन पावसाच्या पाण्यावरती केली जाते

१८. दोंदे गावांमध्ये सिमेंटने बांधलेल्या भिंतींच्या आणि पत्र्यांच्या छप्पर असणाऱ्या घरांचे प्रमाण सर्वाधिक आहे.

१९. अन्नधान्यांमध्ये बाजरी, ज्वारी, गहू, तांदूळ यांचा वापर अनुक्रमे केला जातो.

२०. घरात एलपीजी गॅस असूनही इंधनासाठी लाकडाचा वापर करणारे लोक जास्त आहेत.

२१. दोंदे गावांमध्ये हिंदू धर्म पद्धतीने अनेक सण समारंभ साजरे होतात.

२२. दोंदे गावांमध्ये पुरुषांमध्ये सदरा आणि पॅन्ट घालणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक असून स्त्रियांमध्ये सहावार साडी घालणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक आहे.

२३. दोंदे गावांमध्ये ६२.७९ टक्के कुटुंबांना ग्रामपंचायतीच्या नळाद्वारे पाणीपुरवठा उपलब्ध होतो.

२४. दोंदे गावाच्या वस्तीजवळ इयत्ता चौथी पर्यंत तर गावठाणा मध्ये इयत्ता दहावी पर्यंत मराठी माध्यमाची शाळा आहे.

२५. दोंदे गावांमध्ये 97.21% लोकांकडे स्वतःच्या मालकीचे घर आहे.

२६. दोंदे गावांमध्ये 95.35% लोकांकडे स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध आहे.

२७. दोंदे गावामध्ये ३७.२१ टक्के लोक गावठाणात निवास करतात तर उर्वरित लोक वाडी, वस्तीवर निवास करतात.

२८. दोंदे गावामध्ये ९०.७० टक्के लोक हे भूमीधारक आहेत.

२९. दोंदे गावांमध्ये रस्ते, दवाखाने, वीज ह्या सेवा सुविधा उपलब्ध आहेत.

३०. दोंदे गावांमध्ये सार्वजनिक वाचनालयाची सुविधा उपलब्ध असून दैनिक वृत्तपत्रे उपलब्ध होतात.

**अभाव/समस्या**

१. दोंदे गावात मुख्य रस्ता पक्का डांबरी असला तरी वाड्या वस्त्यांवर जाणारे रस्ते कच्चे आहेत.

२. दोंदे गावात सर्व सोयींनी युक्त असे अद्यावत दवाखाने नाहीत.

३. गावात मराठी माध्यमाची शाळा फक्त इयत्ता दहावी पर्यंत आहे मात्र इंग्रजी माध्यमाची शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाची सुविधा उपलब्ध नाही.

४. दोंदे गावात वाड्यावस्त्यांवरील 4.65% लोकांकडे शौचालये नाहीत.

५. दोंदे गावामध्ये 2.79% बेघर लोकांच्या घरकुलाचा प्रश्न प्रलंबित आहे.

६. ठाकर वाड्यांमध्ये रस्ते, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधांचा अभाव आहे.

७. वाड्या वस्त्यांवरील बऱ्याच लोकांना पिण्याचे पाणी दूर वरून आणावे लागते.

८. दोंदे गावामध्ये उत्पादित होणाऱ्या शेतमालाची विक्री करण्यासाठी आठवडा बाजार सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे.

## उपाययोजना

दोंदे गावाच्या सर्वेक्षणानंतर उपलब्ध सुविधांप्रमाणेच निदर्शनास आलेल्या विविध समस्या व त्यांची सोडवणूक करण्यासाठी उपाय योजनांची आवश्यकता असून प्राधान्य क्रमाने त्या सोडविल्या तर गावातील बहुतांशी समस्यांचे निराकरण होऊ शकते त्या उपाययोजना पुढीलप्रमाणे

1. दोंदे गावांमध्ये उपलब्ध होणाऱ्या शेतमालास स्थानिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आठवडे बाजार सुरू करून बाजार ओटे, बाजार गाळे, शेड, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी सुविधा युक्त असे कृषी मालाच्या विक्रीचे ठिकाण निर्माण करणे व शेतमालास स्थानिक बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी.

2. ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत ठाकरवाडी परिसराला जोडणारे रस्ते हे पक्के सिमेंट काँक्रीट किंवा डांबरीकरणाचे करण्यासाठी पाठपुरावा करणे.

3. दोंदे गावातील नागरिकांच्या वैद्यकीय सुविधा करिता प्राथमिक आरोग्य केंद्रात निवासी डॉक्टरांची नेमणूक करून गरोदर माता तपासणी व प्रसुती केंद्र निर्माण करण्यासाठी जिल्हा वैद्यकीय विभागाकडे त्याबाबत मागणी करून सुविधा निर्माण करावी.

4. दोंदे गावात जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांमधून सेमी व इंग्रजी माध्यमातून अध्ययन सुविधा सुरू करून कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची होणारी गळती थांबविणकरिता गावातच कनिष्ठ महाविद्यालय सुरू करावे.

5. दोंदे गावातील ज्या कुटुंबाकडे शौचालय नाहीत त्या कुटुंबांना ग्रामपंचायत स्तरावर व महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनातून अर्थसहाय्य करून शौचालय बांधण्यास जागा उपलब्ध करून देऊन स्वच्छता व आरोग्याचा प्रश्न सोडविता येईल.

6. गावातील बेघर लोकांना घरकुल मंजूर करणे व घरकुल मंजूर असणाऱ्या लोकांना बांधकामासाठी ग्रामपंचायत व शासकीय गायरान जागा उपलब्ध करून दिल्यास त्यांचा घरकुलाचा प्रलंबित प्रश्न मार्गी लागेल.

7. दोंदे गावठाण व वाड्यावर त्यांना उपलब्ध होणारे पिण्याचे पाणी हे शुद्धीकरण करून ते नागरिकांना उपलब्ध झाल्यास पाण्यातून उद्भवणारे बहुतांशी आजार यांचा निपटारा होईल.

8. दोंदे गावठाणात बस स्थानक शेड हे सर्व सुविधांसह निर्माण करण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य, लोकप्रतिनिधी यांच्या निधीतून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

9. दोंदे गावातील तरुण-तरुणींना कौशल्यपूर्ण शिक्षण सुविधा ग्राम पातळीवरती उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करावेत.

# गावसर्वेक्षणाच्या दरम्यान काढलेली छायाचित्रे










HRM · Pangari,Pune Division 2023.04.21 09:03


HRM · Pangari,Pune Division | 2023.04.21 09:03


HRM · Pangari,Pune Division | 2023.04.21 09:04


HRM | Pangari,Pune Division | 2023.04.21 09:04


HRM | Pangari,Pune Division | 2023.04.21 09:05


HRM | Pangari,Pune Division | 2023.04.21 09:06


HRM / Pune,Pune Division / 2023.04.21 09:11


HRM / Kadus,Pune Division / 2023.04.21 09:44


HRM / Pune,Pune Division / 2023.04.21 09:12


पुजा पोल्ट्री फार्म
हनुमान दुग्धडेअरी
HRM | Donde,Pune Division | 2023.04.21 09:13


HRM | Pune,Pune Division | 2023.04.21 09:15


HRM | Pangari,Pune Division | 2023.04.21 09:16


HRM | Padali,Pune Division 2023.04.21


HRM | Donde,Pune Division 2023.04.21 09:28


स्थापना दि.१ डिसेंबर १९८२
S.S.A. अंतर्गत वर्गखोल्या बांधकाम सन:२००८-०९
जिल्हा परिषद प्राथ.शाळा मैंदाणी ठाकरवाडी (दोंदे)
तंबाखू मुक्त शाळा
HRM | Pune,Pune Division 2023.04.21 09.39










**ग्रामसर्वेक्षणात सहभागी झालेले भूगोल विभागातील टी. वाय. बी. ए. चे विद्यार्थी**